। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २५७ वा । शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट : जिल्ह्यात व्यापक मोहीम

धाराशिव दि.२३ डिसेंबर (जिमाका) देशातून कुष्ठरोगाचा प्रसार पूर्णतः समाप्त करण्यासाठी केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ ते २२ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात आले.या अभियानात एकूण १० हजार ७५ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १४१ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत.

शोधण्यात आलेल्या सर्व नवीन रुग्णांवर तातडीने बहुविध औषधोपचार (एमडीटी) सुरू करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कुष्ठरोगावर प्रभावी प्रतिबंधक लस उपलब्ध नसल्यामुळे रोगाचा प्रसार थांबविण्यासाठी नव्याने आढळलेल्या रुग्णांच्या निकट संपर्कातील (किमान ३०) सहवासीतांना प्रतिबंधात्मक औषध देणे अत्यंत आवश्यक आहे.यासाठी रिफॅम्पिसीनची एक प्रतिबंधात्मक मात्रा (झीं एंीीिश झीहूश्रुळी - झएझ) दिली जाते.या मात्रेमुळे शरीरातील जंतू नष्ट होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते व रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते.

त्या अनुषंगाने दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व पात्र सहवासीतांना मोहिमेच्या स्वरूपात एक दिवसाची प्रतिबंधात्मक मात्रा (झएझ) देण्यात येणार आहे.या प्रक्रियेपूर्वी सर्व सहवासीतांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे.ही प्रतिबंधात्मक मात्रा देण्याची प्रक्रिया जिल्ह्यात नियमितपणे सुरू असून त्यामुळे कुष्ठरोगाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होत आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे जिल्ह्यात एकाही नवीन कुष्ठरुग्णास विकृती (उ्ळीरलळश्रळीं) आढळून आलेली नाही तसेच गंभीर रुग्णांचे प्रमाणही घटत आहे.

मागील तीन वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहवासीतांना प्रतिबंधात्मक मात्रा (झएझ) देण्यात आलेली आहे.सन २०२२-२३, २०२३-२४ तसेच सन २०२५-२६ (नोव्हेंबर २०२५ पर्यंत) या कालावधीत हजारो पात्र सहवासीतांना ही मात्रा देण्यात आली असून त्यामुळे रोग साखळी तोडण्यात महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.

१० नोव्हेंबर ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानात आढळलेल्या नवीन रुग्णांच्या संपर्कातील एकूण १२ लक्ष १८ हजार ९३ सहवासीतांना २४ डिसेंबर २०२५ रोजी मोहिमेच्या स्वरूपात प्रतिबंधात्मक मात्रा देण्यात येणार आहे.

प्रतिबंधात्मक मात्रा (झएझ) खालील व्यक्तींना देण्यात येणार नाही : गर्भवती महिला,गंभीर आजारी व्यक्ती,दोन वर्षांखालील बालके,क्षयरोगाचा उपचार सुरू असलेले रुग्ण,कुष्ठरोगाचे संशयित रुग्ण,कुष्ठरोगावर सध्या उपचार घेत असलेले रुग्ण यांचा समावेश आहे.

रिफॅम्पिसीनची प्रतिबंधात्मक मात्रा (झएझ) वजनानुसार पुढीलप्रमाणे देण्यात येईल :

वजन ३५ किलोपेक्षा जास्त - ६०० मि.ग्रॅ.,वजन २० ते ३४ किलो - ४५० मि.ग्रॅ.,वजन २० किलोपेक्षा कमी - प्रति किलो १० ते १५ मि.ग्रॅ.अशाप्रकारे ही मात्रा देण्यात येईल.

ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी,वैद्यकीय अधीक्षक,प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी यांनी समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आशा कार्यकर्ती यांच्या समन्वयाने कार्यवाही करावी,अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

आपल्या घरी येणाऱ्या आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्तीमार्फत रिफॅम्पिसीनची प्रतिबंधात्मक एक मात्रा स्वीकारून सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर तसेच सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.मारुती कोरे यांनी केले आहे.

## २ जानेवारी ते ११ जानेवारी दरम्यान उर्स-७२१ दर्गा हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहेमतूल्ला

धाराशिव दि.२३ डिसेंबर (जिमाका) सोफी संत हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहेमतुल्ला हे एक थोर संत होऊन गेले. धाराशिव शहराच्या दक्षिण भागात त्यांचा भव्य व आकर्षक दर्गा आहे.या दर्ग्याचा दरवर्षी मोठ्या उत्साहात उर्स साजरा केला जातो.या उर्सामध्ये हिंदू-मुस्लिम यासह सर्व धर्मांचे भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात.हा उर्स सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असून ही परंपरा सुमारे ७२१ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे.

उर्स दरम्यान दरवर्षी संदल मिरवणूक, कव्वाली,मुशायरा,शबे-गझल, महफिल-ए-समा,वाजबयान इत्यादी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.मागील वर्षाप्रमाणे यंदाही वर्ष २०२६ साठी खालीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन ऊर्स आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

जानेवारी २०२६ मधील उर्स कार्यक्रमांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

२ जानेवारी २०२६ (शुक्रवार) पंखा निवड कार्यक्रम.
३ जानेवारी २०२६ (शनिवार) सेहरा मिरवणूक कार्यक्रम.
४ जानेवारी २०२६ (रविवार) गुसल पाणी मिरवणूक कार्यक्रम.
५ जानेवारी २०२६ (सोमवार) मुख्य संदल मिरवणूक व महफिल-ए-समा कार्यक्रम
६ जानेवारी २०२६ (मंगळवार) चिरागा कार्यक्रम,कव्वाली व महफिल-ए-समा
७ जानेवारी २०२६ (बुधवार) कव्वाली कार्यक्रम व जियारत.
८ जानेवारी २०२६ (गुरुवार) वाजबयान कार्यक्रम व नाते शरीफ.
९ जानेवारी २०२६ (शुक्रवार ) मुशायरा कार्यक्रम.
१० जानेवारी २०२६ (शनिवार) गझल कार्यक्रम.
११ जानेवारी २०२६ ( रविवार) कुस्ती कार्यक्रम,आतिषबाजी व उर्स समाप्ती होणार आहे.

मागील वर्षाप्रमाणे यंदाही वरील सर्व कार्यक्रम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वतीने जिल्हा वक्फ अधिकारी,धाराशिव यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणार आहेत.

दर्गा हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहेमतुल्ला यांच्या वार्षिक उर्सचे आयोजन शांततापूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने होणार आहे. अशी माहिती जिल्हा वक्फ अधिकारी,धाराशिव यांनी दिली.

## स्टँडअप इंडिया योजनेतून अनुसूचित जाती व नवबौद्ध उद्योजकांना १५ टक्के अनुदानाचा लाभ

धाराशिव (जिमाका) -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये स्टँडअप इंडिया ही योजना जाहीर केली असून,या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. स्टँडअप इंडिया योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील सवलतीस पात्र नवउद्योजकांनी १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर आणि संबंधित बँकेने अर्जदारास ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित १५ टक्के रक्कम फ्रंट एन्ड सबसिडी स्वरूपात राज्य शासनामार्फत देण्यात येते. ही सवलत स्टँडअप इंडिया योजनेत पात्र ठरलेल्या राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित लाभार्थ्याने अनुदानासाठी आयुक्त,समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या नावे विहीत नमुन्यात मागणीपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच या अर्जासोबत उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र,जात प्रमाणपत्र,बँकेचे कर्ज मंजुरी पत्र, बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्प अहवालाची प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र नवउद्योजकांनी अधिक माहितीसाठी व अर्ज प्रक्रियेसाठी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण धाराशिव,श्री.सचिन कवले यांनी केले आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुग (प्रतिनिधी)-' पोलीस ठाणे अंतर्गत धोंडीबा तुकाराम जिड्डीमणी, वय ६१ वर्षे, रा. मादन हिप्परगा ता. आळंद जि. कलबुर्गी यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी .काशिनाथ बंडगर यांचे शेताजवळ पिकअप क्र एमएच ३२ एए ६८४४ मध्ये गोवंशीय जातीचे तीन बैल व एक खोंड एकुण १,२३,००० गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) सह कलम ५(ए),५(बी), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सह कलम ८३, १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सुर्यकांत रा. येवती ता.तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२३.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरा समोर अंदाजे ५,१०० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

धाराशिव शहर पोलीस ठाण अंतर्गत अकाबाई रा. कृष्णा नगर बार्शी नाका धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.२४.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर कृष्णा नगर बार्शी नाका धाराशिव येथे अंदाजे ६,७०० किंमतीची ११५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत शाहुराज रा. नागुर लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.२४.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या पत्र्याचे शेड समोर अंदाजे १,३०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

वाशी पोलीस ठाणे अंतर्गत महिंद्र रा. पिंपळगाव लिंगी ता. वाशी जि. धाराशिव हे दि.२४.१२.२०२५ रोजी पिंपळगाव लिंगी येथे आपल्या शेडसमोर अंदाजे १,७०० किंमतीची १७ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत समाधान रा. देवकुरुळी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२४.१२.२०२५ रोजी देवकुरुळी ते काटगाव जाणारे रोडचे बाजूस ऑटेल सरपंच च्या बाजूला मोकळ्या जागेत अंदाजे १,९०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत अनिता रा. भोगजी ता.कळंब जि. धाराशिव या दि.२४.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द कळंब पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

## भारतीय स्टेट बँक, आरबीओ धाराशिव येथे 'अन्नदाता उत्सव' अंतर्गत प्रगतशिल शेतकरी व कृषी उद्योजक ग्राहक मेळावा




धाराशिव,(प्रतिनिधी)- भारतीय स्टेट बँक, आरबीओ धाराशिव यांच्या वतीने 'अन्नदाता उत्सव' उपक्रमांतर्गत आज धाराशिव येथे प्रगतशिल शेतकरी व कृषी उद्योजक ग्राहक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यास सुमारे ७० पेक्षा अधिक प्रगतशील शेतकरी व कृषी उद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित अन्नदात्यांच्या सन्मानपूर्वक स्वागताने करण्यात आली.

यावेळी प्रादेशिक व्यवस्थापक मा. श्री. सुरेशबाबू उदयगिरी यांनी प्रास्ताविक भाषणात 'अन्नदाता उत्सव' आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत, ग्रामीण विकासात स्टेट बँक ऑफ इंडियाची भूमिका अधोरेखित केली. शेतकरी व उद्योजकांनी आपल्या आर्थिक स्थैर्यासाठी एसबीआयशी अधिकाधिक संलग्न राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (उ्छ-ज) मा. श्री. राजकुमार मोरे यांनी कृषी अनुदान योजनांची माहिती देत उच्च मूल्य प्रस्तावांमध्ये बँकांची भूमिका स्पष्ट केली. तसेच उत्पादक शेतकऱ्यांनी निर्यातीकडे वळावे, असे आवाहन करण्यात आले.

तसेच पीएमएफएमई योजनेचे प्रतिनिधी श्री. राहुल दिवाण (तांत्रिक अधिकारी, उ्छ-ज) यांनी पीएमएफएमई योजनेअंतर्गत उपलब्ध अनुदान, प्रक्रिया व दर्जेदार प्रकल्प सादर करण्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी ठचठण श्री. प्रदीप गायकवाड यांनी -खक्र, झचक्रचए, -कखउ्क्र, -क्रएङ आणि घडठ योजनांवर सविस्तर सादरीकरण केले.

क्रडढज श्री. किरण चांदोरकर यांनी बँक वित्तपुरवठ्यात उखइखङ स्कोअरचे महत्त्व, स्कोअर सुधारण्याच्या उपाययोजना व उच्च मूल्य प्रस्तावांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली.

कार्यक्रमात प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार मा. प्रादेशिक व्यवस्थापक व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी काही कर्जदार व प्रगतशील शेतकऱ्यांनी आपल्या यशोगाथा मांडत, एसबीआयकडून मिळालेल्या वेळेवरच्या आर्थिक सहाय्यामुळे आपल्या व्यवसायात झालेली प्रगती अनुभवांच्या माध्यमातून सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विद्याधर ढगे यांनी केले, तर मुख्य व्यवस्थापक (क्रेडिट) मा. श्री. आशिषकुमार श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## युवकांसाठी मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम कौशल्य अभ्यासक्रम सुरू

धाराशिव दि.२३ डिसेंबर (जिमाका) उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा व्हावा तसेच युवक-युवतींना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात,या उद्देशाने राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम राबविण्यात येत आहे.या योजनेंतर्गत दरवर्षी सुमारे ७५ हजार युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यात येणार असून,नवीन कौशल्यावर आधारित विविध अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील राज्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांमध्ये इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी,टेलिकॉम,इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), ड्रोन तंत्रज्ञान, ग्रीन हायड्रोजन, मोबाईल रिपेअर टेक्निशिअन, ॲपेरल, इलेक्ट्रॉनिक्स, सोलार टेक्निशिअन, सायबर सुरक्षा, ग्राफिक डिझाइन, टुरिझम ॲण्ड हॉस्पिटॅलिटी आदी अभ्यासक्रमांचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी https://msbsvet.edu.in/Public/ITIShortTermTraining.aspx या संकेतस्थळावरून आपली इच्छुकता नोंदविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३४ वर संपर्क साधावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

## पौगंडावस्थेतील मुलींनी सकस आहार घेणे आवश्यक स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शशी कानडे



उमरगा पौगंडावस्थेतील मुलींसाठी पोषण महत्त्वाचे आहे. आहारात कॅलरीज, लोह प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि खनिजे या पोषक तत्त्वांचा संतुलित आहारात समावेश असावा, या काळात शारीरिक वाढ व मासिक पाळीमुळे रक्ताची कमतरता निर्माण होऊ शकते, यासाठी हिरव्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये, दूध,अंडी व मांसाचा आहारात समावेश असणे गरजेचे आहे, असे मत स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शशी कानडे यांनी व्यक्त केले.

भारत शिक्षण संस्थेच्या तालुक्यातील बेडगा भारत विद्यालयात पौगंडावस्थेतील मुलींसाठी पोषण मूल्य, सकस आहार व आरोग्य यावर मंगळवारी (२३) आयोजित कार्यशाळेत स्त्रीरोग तज्ञ डॉ शशी कानडे बोलत होत्या. रोटरी क्लब अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे, वंदनाताई मेनकुदळे, ज्ञानेश्वर माशाळकर, श्रीमती पवार आदींची उपस्थिती होती. या वेळी वंदना मेनकुदळे यांनी विचार व्यक्त केले. डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक चौहान यांनी अध्यक्षीय समारोपात निरोगी जीव जगण्यासाठी आहार व व्यायाम करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

आहाराबरोबर खेळ, योगा, प्राणायाम लाभदायक या वेळी डॉ. शशी कानडे यांनी पौगंडावस्थेतील मुलींनी कोणता आहार घ्यावा, किती व कशा पद्धतीने घ्यावा. कर्बोदके, प्रथिने, फॅट, व्हिटॅमिन्स, मिनरल्स व फायबर आदी घटक कोणत्या अन्न पदार्थामधून मिळतात, किती प्रमाणात घ्यावे याची माहिती देऊन खेळ, व्यायाम योगा, प्राणायामचे महत्व शरीरासाठी व मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त आहे. रोज योगा करण्याचा सल्ला दिला. युवती व महिलांनी आरोग्याची काळजी कशी घ्यायची याबद्दल माहिती दिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अखेर दोन भाऊ एकत्र आले

राज्यात अनेक वर्षापासून दोघे भाऊ एकत्र येणार असे भाकित केले जात होते. दोन भाऊ म्हणजे राज व उद्धव ठाकरे हे होय. मुळात दोघे वेगळे का झाले? या बाबतचा इतिहास सर्वांना माहिती आहे. त्याच प्रमाणे राज ठाकरे यांना नवीन पक्ष का काढावा लागला या बाबतची माहिती राज्यातील जनतेला माहिती आहे. राज दुरावल्यामुळे मुळे शिवसेनेची मोठी हानी झाली आहे. पुत्र मोहापोटी व महाबळेश्वरच्या राज्यस्तरीय बैठकित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी उद्धवजींना कार्याध्यक्षपद दिले. वास्तविक त्यावेळी राज ठाकरे सक्रिय होते. विद्यार्थी सेनेचे काम पाहात होते. एक मोठी संघटन शक्ती पाठीशी होती. त्यांना कळाले की, उद्धव ठाकरे हे कार्याध्यक्षपदी निवडले गेले, त्याचवेळी ते परत फिरले, पुन्हा त्यांनी शिवसेनेसोबत न जाता ते मनसे नवा पक्ष काढला व सतत लढत राहीले, त्यांनी अनेक मुद्दयाला हात घातला. मराठी, टोलमाफी, मराठी कामगाराविषयी, तसेच जनतेविषयक प्रश्न उचलून धरले. त्यांनी मराठी माणसासाठी अनेक पावले उचलली, त्यामुळे सुरवातीच्या काळात चांगले आमदार निवडूणही आणले. नंतर त्यांना राजकारणारत यश मिळाले नाही. तरी त्यांनी पकड सोडली नाही. दुसरीकडे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले. शरद पवार यांचा पुढाकार अधिक होता. हिंदुसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना काँग्रेसची आघाडी केंव्हांही मान्य नव्हती. ते उद्धव ठाकरे यांना सत्तेच्या लालचापोटी मान्य केली. दुसरे ज्या-ज्यावेळी राज ठाकरे यांना जवळ करण्याचा प्रसंग आला त्या-त्यावेळी उद्धव ठाकरे यांचा सकारात्मक प्रयत्न दिसून आला नाही. उद्धव ठाकरे यांनी मोठी चुक झाली ती म्हणजे निष्ठावंत हिंदुत्त्वादी शिवसैनिक सोडून गेले, त्यांच्या मनधरणी करून परत बोलविणे कर्तव्य होते. आज भाजपाची ताकद वाढली ती शिवसेनेच्या कृपेमुळे वाढली. एकनाथ शिंदे यांनी बंड केले नसते तर अजूनही भाजपाला सत्ता मिळविता आली नसती. एकदा का भाजपाने पकड घेतली की, ते सोडत नाहीत. सध्याला ही भाजपाने तातडीने मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्याही जुळऊन घेतले आहे. मुळात राजकारणारत पक्के असावे लागते. राज ठाकरे यांचा पिंड हा राजकारणी आहे. त्यामुळे आजही ते यशस्वी झाले आहेत. राज व उद्धव एकत्र आले म्हणजे काळाची गरज नाही तर दोघांना मिळत असलेले अपयशामुळे एकत्र आले हे अनेकांना कळून आले आहे. पहिल्यांदा म्हणजे सुरवातीस जसे मनसेला यश मिळाले तसे पुन्हा मिळाले नाही. उद्धव ठाकरे यांच्या बरोबर आघाडी करण्यात काँग्रेसने नकार दिला. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची स्थिती समाधान कारक नाही. राज्यात नुकत्याच नगरपालिका व नगरपंचायतच्या निवडणुकीत भाजपाला मोठे यश आले. एकनाथ शिंदे यांना आले. काँग्रेस, शरद पवार व उद्धव ठाकरे यांची स्थिती काय राहीली. यापुढे तर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काय होणार? त्यामुळे काळ व वेळ पाहून योग्य निर्णय ठाकरे बंधुंनी घेतला आहे. हे मिलन केवळ मुंबई महानगरपालिके च्या मर्यादित आहे का? राज्यात ज्या-ज्या ठिकाणी महानगरपालिकेची निवडणुका होणार तेथे दोघे मिळून काम करणार का? मुंबई महानगरपालिका ही भाजपा आपल्याकडे खेचण्यासाठी दोन वर्षापासून प्रयत्न सुरु आहेत. मनसे व उद्धव ठाकरे निवडणुकीच्या तोंडावर एकत्र आले आहेत. त्यांचा विश्वास मुंबईकरांवर बसेल का? पुर्वी मुंबई ही पुर्ण मराठी माणसाची होती. आता गुजराती, बिहारी, युपीची संख्या अधिक आहे. सर्वांना सोबत ठाकरे बंधु घेऊन जाऊ शकतात का? मुळात मराठी गिरणी कामगार, माणुस किती राहीला आहे. मराठी माणसाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांचा भक्कम पाठींबा होता. तो आज दिसून येतो का? मध्यंतरी राज ठाकरे हे भाजपासोबत जाणार असे बोलले जात होते. मनसेसाठी हा फायद्याची बाब होती. ठाकरे बंधुंना मुंबई महानगरपालिका महत्त्वाची वाटते, त्यापेक्षा कितीतरी पटीने भाजपाला वाटत आहे. देशातील आर्थिक राजधानी आहे त्यापेक्षा मुंबई ही राज्याची राजधानी आहे. मुंबई इतर राज्यांना जोडली जाणार हे कदापी होऊ शकत नाही. मुंबई ही मराठी माणसाची आहे ती कायम राहाणार आहे. दोघे एकत्र बंधु आल्यास काय होणार आहे? त्यांच्या हाती सत्ता नसली तरी मराठी माणसासाठी त्यांचे योगदान मोठे आहे हे मान्यच केले पाहिजे. मुंबईही देशाची शान आहे. आर्थिकदृष्टया संपन्न आहे. वास्तविक दोघे बंधू जर एक वर्षापुर्वी एकत्र आले असते तर निश्चित सकारात्मक परिणाम दिसून आला असता. सध्याच्या परिस्थितीत केवळ महानगरपालिकेची निवडणुकापुर्वी जर युती होणे दोघांसाठी सकारात्मक परिणाम दिसून येईल असे वाटत नाही. तसे पाहिले तर मनसेचे विचार व शिवसेनेचे विचार एकच समजले जातात. सध्याला मुंबई महानगरपालिकेची निवडणुक प्रक्रिया चालू झाली, त्यानंतर ठाकरे बंधु एकत्र आले आहेत. ते जर निवडणुकीच्या घोषणापुर्वी एकत्र आले असते तर जनतेत वेगळाच संदेश मिळाला असता. आता निवडणुकीसाठी एकत्र आलो नाहीत असे म्हणत असले तरी जनतेला समजते की कशासाठी व कोणत्या बाबीमुळे एकत्र आला आहात. सध्याला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह अजित पवार व काँग्रेसची स्थिती कशी आहे. नगरपालिकेचा निकाला नंतर महानगरपालिकेच्या निवडणुकीत मोठा बदलाची अपेक्षा करणे योग्य ठरविणे नाही. जवळपास स्थानिक स्वराज्यसंस्थेतील निकाल सत्ताधाऱ्यांच्या बाजूने लागले आहेत. शिवसेना बरोबर राष्ट्रवादीचे दोन गट आहेत. एकनाथ शिंदे यांनी मिळविल्या जागा व काँग्रेसह शरद पवार, उद्धव ठाकरे यांना मिळालेल्या जागेची बेरीज बरोबर होते. मोठ्या शहरात शिकलेली मंडळींची संख्या अधिक असते. विचारपुर्वक मतदान होते. दोघे बंधु एकत्र आल्यास फार मोठा बदल होईल असे वाटत नाही. यदाकदाचित आगामी काळात दोघे एकत्र आल्याने परिणाम दिसून येऊ शकतो. मराठी माणसासाठी दोघे भाऊ एकत्र आल्याचे समाधान मराठी माणसाला लाभणार आहे हे नक्की!

# बार्टी एक समता प्रस्थापित करणारी सामाजिक चळवळ!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टी या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त प्रशिक्षण व संशोधन संस्थेची स्थापना होऊन २२ डिसेंबर ४७ वर्ष पूर्ण झाली आहेत . या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यावर टाकलेला प्रकाश

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनेक चळवळी उदयास आल्या .काही काळापुरत्या, काही क्षणिक, तर काही दीर्घकाल टिकून राहणाऱ्या. पण बार्टी, अर्थात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ही संस्था नव्हे तर ती एक समता प्रस्थापनेसाठी जणू चळवळ म्हणून काम गेल्या ४७ वर्षापासून अनुसूचित जातींसाठी काम करीत आहे आहे.

ही संस्था केवळ एका विषयापुरती मर्यादित नाही; तर शिक्षण, प्रशिक्षण,संशोधन,लेखन, मूल्यमापन, सामाजिक न्याय, समता आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन यांचा संगम आहे. त्यामुळेच ''बार्टी'' ही संस्था नसून एका विचारसरणीची सतत चालती-बोलती मोहीम आहे.

बार्टीच्या स्थापनेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भक्कम पाया आहे. महाराष्ट्र शासनाने सामाजिक समता या विषयावर सखोल अभ्यास,संशोधन व प्रशिक्षणाचे कार्य व्हावे या उद्देशाने या संस्थेची १९७९ मध्ये मुंबईमध्ये स्थापना केली. पुढे ही संस्था १९८७ मध्ये पुण्यात स्थलांतरित झाली.या संस्थेच्या दैनंदिन कामकाजामध्ये स्वायत्तता यावी व संस्थेचे काम अधिक जलदगतीने व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २००८ मध्ये या संस्थेला यशदा या प्रशिक्षण संस्थेसारखा स्वायत्तेचा दर्जा दिला.

बार्टीच्या धर्तीवर आज विविध समाजाच्या उत्कर्षासाठी अनेक संस्था उदयाला आलेल्या आहेत. त्यामध्ये सारथी, महाज्योती आर्टी या संस्थांचा समावेश आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले असून त्यांच्या नियंत्रणाखाली संस्थेचे कामकाज सुरू आहे.

त्याचबरोबर या नियमाक

मंडळामध्ये विविध खात्यातील सुमारे १० वरिष्ठ सनदी अधिकारी यांचा समावेश आहे.संस्थेने ४७ वर्षात अनेक महत्त्वपूर्ण काम केली आहेत. अलीकडे संस्थेचा व्यापक विस्तार झाला असून संस्थेची ध्येय, उद्दिष्ट याप्रमाणे विविध सामाजिक समतेशी निगडित संशोधन प्रकल्प,वंचित घटकासाठी काम करणारे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांना प्रशिक्षण, सामाजिक न्याय विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची प्रशिक्षणाद्वारे क्षमतावृद्धी, सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे मूल्यमापन केले जाते.

विविध स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य,उद्योजकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम, अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट कायद्याची जाणीव जागृती, त्याचबरोबर महापुरुषांच्या कार्याचा जागर व्हावा यासाठी अनेक कार्यक्रम, उत्सव या संस्थेच्या माध्यमातून होतात.


समाजातील वंचित, पीडीत, उपेक्षित माणसाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांचाच विचार पुढे नेण्याचे काम ही संस्था करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधित महाड येथील चवदार तळे येथील स्मारक, येवला येथील प्रेरणाभूमी, स्मारक याची देखभाल व दुरुस्ती तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे समन्वय व तसेच येथे अनेक समाजउपयोगी कार्यक्रम राबविण्याची जबाबदारीही या संस्थेकडे आहे.

वंचित, मागास, आणि आर्थिक स्थितीने दुर्बल असलेल्या तरुणांना केवळ स्वप्ने दाखवणे नाही, तर त्यांच्या स्वप्नांना बळ देणे व त्यांना स्वप्नांच्या दिशेने नेणे, त्याची वाट दाखवणे हे काम बार्टी सातत्याने करते.

बार्टीचा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठा प्रकल्प आहे तो राजधानी दिल्ली सह राज्यभर विस्तारला आहे.

बार्टीने स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण सुरू केले, तेव्हा हा उपक्रम फार मोठा आणि धाडसी होता. यूपीएससी एमपीएससी सारख्या परीक्षांसाठी लाखो रुपये खर्च होतात, कोचिंगची सुविधा सहज सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांसाठी मिळत नाही. पण बार्टीने हे सर्व मोफत उपलब्ध करून दिले. योग्य मार्गदर्शन, अभ्यास साहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक, निवासी प्रशिक्षण व शिस्तबद्ध वातावरण यामुळे महाराष्ट्रातील हजारो तरुणांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला.

एखाद्या तरुणाचे आयुष्य बदलणे म्हणजे त्याच्या कुटुंबाच्या आणि पुढच्या पिढ्यांच्या भविष्यामध्ये प्रकाश पेरणे होय. अशी हजारो घरात प्रकाश पेरण्याचे व त्या घरांना उजळवण्याचे काम बार्टीने केले आहे. हीच सामाजिक जागृती आणि सक्षमीकरणाची खरी चळवळ आहे. त्यात बार्टी झोकुन देऊन काम करत आहे.




सामाजिक संशोधन हे बार्टीचे दुसरे मजबूत अंग आहे. विविध जाती,समाजांची शैक्षणिक स्थिती, आर्थिक प्रगती, रोजगार, आरक्षणाची अंमलबजावणी, सामाजिक विषमता, ग्रामीण-शहरी तफावत, तरुणांचे कौशल्य या आणि अशा अनेक विषयांवर बार्टीने संशोधनात्मक अभ्यास केला. धोरणनिर्मिती करणाऱ्यांना दिशा देणे, समाजातील समस्या वैज्ञानिक पद्धतीने ओळखणे आणि त्यावर उपाय सूचवणे ही परिवर्तनाची बौद्धिक बाजू आहे. त्यामुळे बार्टी आपल्या संशोधन विभागामार्फत अनेक संशोधन प्रकल्प राबवून हे काम करीत आहे.

आर्थिक सबलीकरण हा सामाजिक समतेचा मुख्य पाया आहे. फक्त नोकरीच्या संधी वाढविल्या जाऊन समाज बदलत नाही; तर तरुणांनी स्वयंरोजगार, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातही उतरले पाहिजे. त्यासाठी बार्टीने अनेक उद्योजकता विकास कार्यक्रम राबवले, तरुणांना वित्तीय ज्ञान दिले, स्टार्टअप सुरू करण्याचे कौशल्य शिकवले आणि उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मानसिकता निर्माण केली.

आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे म्हणजे सामाजिक साखळ्या तुटणे आणि स्वतः चे भविष्य स्वतः घडवणे. ही प्रक्रिया वेगाने वाढत आहे आणि बार्टीची ही चळवळ गावोगावी पोहोचत आहे. तरुणांना उद्योगाकडे वळविण्यासाठीही बार्टीचा मोठा सहभाग आहे.आज कौशल्य विकास विभागामार्फत असे अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू आहेत.

त्याचबरोबर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीही संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण, शिष्यवृत्ती दिली जाते त्यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी जेईई, नीट, अभियांत्रिकी, न्यायालयीन सेवा, स्टाफ सिलेक्शन, लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा समावेश आहे. दरवर्षी संस्थेमार्फत हजारो विद्यार्थ्यांना याचा फायदा होतो. त्याचबरोबर मुख्य परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीला तोंड देण्यासाठी आर्थिक सहाय्य ही संस्था करते.

त्याचबरोबर शिव , शाहू-फुले-आंबेडकरी, अण्णाभाऊ साठे साहित्य निर्मितीसाठी तसेच हे साहित्य अत्यंत अल्प किमतीमध्ये सर्वदूर सर्वसामान्य लोकांपर्यंत कसे पोहोचेल, यासाठी बार्टीचा विस्तार व सेवा तसेच प्रकाशन प्रसिद्धी विभाग प्रयत्नरत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान आणि ज्या संविधानामुळे संबंध देश एकसंध आहे त्या संविधानाचा प्रचार- प्रसार देशात जर सर्वाधिक कोणी केला असेल तर तो बार्टी या संस्थेने.

या संस्थेने आतापर्यंत लाखो संविधानाच्या प्रति अत्यंत कमी दरात लोकांपर्यंत पोहोचविल्या आहेत. यासाठी स्वतंत्र भांडार निर्माण केले आहे. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य इतर भाषेत भाषांतरित करून इतर राज्यांपर्यंत बाबासाहेबांचा विचार अधिक जोमाने पोहोचवण्याचे काम सुद्धा ही संस्था करत आहे. संविधानिक मूल्यांचा प्रसार तसेच समाजातील अज्ञान, अंधकार, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट करण्याचे कामही संस्थेचे सुमारे ३०० समतादूत करीत आहेत तसेच शासनाच्या विविध योजनांचा प्रचार- प्रसार करण्याचे कामही राज्यभर हे समतादूत रोज करतात.

व्याख्याने प्रबोधनाचे कार्यक्रम, प्रकाशने, ग्रंथालय सेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, संशोधनपर ग्रंथ, डॉ. आंबेडकरांच्या विविध पैलूंचा तसेच छत्रपती शिवाजी महाराज, छ.शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचे काम संस्था सातत्याने करते. अशा कार्यक्रमांमुळे नव्या पिढीत सामाजिकता, बौद्धिकता वाढत आहे.यातून समाजाचे विचारविश्व बदलले तरच समाज बदलतो या तत्त्वावर बार्टी उभी आहे.

आजची बार्टी डिजिटल पिढीसाठी नवे आयाम उघडत आहे. ऑनलाईन कोर्सेस, डिजिटल प्रशिक्षण मॉड्यूल्स, व्हर्च्युअल क्लास, वंचित विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट-आधारित संधी निर्माण करणे हे सर्व आधुनिक उपक्रम सामाजिक परिवर्तनाची, नव्या युगाची आहेत . पूर्वी गावात कोणी आयएएसअधिकारी पाहिला नसेल; पण आता त्या गावातीलच एखादा मुलगा किंवा मुलगी आयएएसअधिकारी होऊन परत जाते आणि समाजातील इतर मुलांसाठी प्रेरणा ठरते.

हे परिवर्तन सहज घडत नाही; त्यासाठी काही संस्था, माणसं काम करत असतात. यामध्ये बार्टी अग्रेसर आहे. बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना थेट दिल्लीमधील नामवंत क्लासेसमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते या संस्थांच्या माध्यमातून अनेक जण केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयएएस आयपीएस, सनदी अधिकारी झाले आहेत.

यात बार्टीची मोठी भूमिका आहे. संस्थेच्या माध्यमातून पीएचडीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही फेलोशिपच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाते, यामुळे अनेक जण उच्चविद्याविभूषित व पीएचडी धारक बनले आहेत. बार्टी अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी, त्यांच्या उत्थानासाठी संस्थेचे प्रेरणास्थान व सामाजिक न्याय खात्याचे मंत्री ना. संजय शिरसाठ, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, खात्याचे प्रधान सचिव मा.डॉ. हर्षदीप कांबळे व बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाने निरंतरपणे चौफेर वाटचाल करत आहे.

अनेक योजनांमुळे बार्टीने समाजात स्वाभिमानाची परंपरा निर्माण केली. 'मी काही करू शकतो', 'माझ्याकडेही क्षमता आहे', 'माझेही स्थान आहे',हा आत्मविश्वास जेव्हा एखाद्या वंचित समुदायात जागा होतो, तेव्हा तो समुदाय चळवळीत सामील झाल्याशिवाय राहत नाही.

बार्टीने निर्माण केलेली ही मानसिक क्रांतीची मशाल तिची सर्वांत मोठी उपलब्धी आहे. अलीकडे काही जण जाणीवपूर्वक बार्टीचे नाव मलीन करण्याचा प्रयत्न करतात, पण त्यांनी बार्टीने केलेले अनेक सकारात्मक कामेही जाणून घेतली पाहिजेत,याची यादी खूप मोठी आहे.

बार्टी ही संस्था सरकारी कार्यालय नसून समाजाचा मानबिंदू आहे. तिच्या उपक्रमांतून होणारा बदल केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नाही, तर तो कुटुंब, समाज, प्रदेश आणि राज्याला स्पर्श करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, शिक्षणाची कास धरलेले भविष्य आणि समानतेवर आधारित सामाजिक बांधणी हे सर्व घटक या संस्थेनं पुढे नेले आहेत. बार्टी केवळ एका विषयावरच काम करत नाही तर अनेक विषय घेऊन बार्टी काम करत आहे.

बार्टीने आपल्या कार्याच्या विविध कक्षा रुंदावल्या आहेत. संस्थेने अनेक समविचारी सरकारी संस्था, इतर राज्यातल्या संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करारही केले आहेत. खरे तर संस्था आज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावत आहे, त्यामुळेच अनेक होतकरू व गरीब विद्यार्थ्यांचे संस्थेमुळे स्वप्न साकार झालीत,त्यामुळेच

समता, शिक्षण, संशोधन, आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय यांचा अखंडित प्रवाह बनली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचा हा आधुनिक अध्याय बार्टीशिवाय अपूर्णच राहील.

**-डॉ. बबन जोगदंड**
**विभागप्रमुख**
**विस्तार व सेवा ,बार्टी, पुणे**
**९८२३३३८२६६**

# काळ्या मातीतला बाप

काळ्या मातीशी नातं जुळं,
बापाचं जिणं मातीत मुरं ।
पहाट फुटं, दवात चालं,
शेतात जाऊन जीव झिजं ।।१।।

हातात नांगर, पाठीवर ऊन,
तोंडात नाही कधीच पुन ।
दिवस गेला, राती गेली,
तरी बापाची आस न ढळली ।।२।।

बीज टाकी, देवाचं नाव,
घाम गाळी, ठेवितो भाव ।
पाणी नसे, तरी भरोसा,
मातीत देव, देवात माणसा ।।३।।

भाकर कोरडी, मीठ जरा,
तरी समाधान त्याच्या उरा ।
लेकरांसाठी झिजे देह,
न बोलताच सोसे स्नेह ।।४।।

सोनं उगे काळ्या मातीत,
बाप हरखतो त्या पिकात ।
घामाचं चीज, देवाचं देणं,
बापाचं जिणं-देवपणं ।।५।।

माथा टेकितो त्या चरणी,
शब्द अपुरे, भाव भरुनी ।
तुका म्हणे तैसा नाही,
पण बाप माझा देवच पाही ।।६।।

**कवी - राहूल हरीभाऊ इंगळे**
**रा. करकटटा ता.जि.लातूर**
**मोबाईल - ९८९०५७७१२६**

## नोमोफोबिया म्हणजे नेमके काय व्यक्तीला 'या' गोष्टीची वाटू लागते भीती

प्रत्येक व्यक्तीला एखाद्या गोष्टीची भीती वाटतेच. एखाद्या वस्तू, परिस्थिती, कार्यक्रम, भावना किंवा प्राण्याबद्दल वाटणारी तीव्र भीती म्हणजे फोबिया. कदाचित तुम्हालाही कशाची तरी भीती वाटत असेल. आजकाल आपल्या सर्वांकडे फोन असतोच. आज क्वचितच असा कोणी असेल जो मोबाईल वापरत नसेल. मोबाईल फोन आणि इंटरनेट ही मानवाकडून सर्वाधिक वापरली जाणारी एक गोष्ट आहे. पण तुम्हाला माहित आहे का की, मोबाईलचा अतिवापर केल्याने तुम्हाला गंभीर आजार होण्याची शक्यता आहे.

मोबाईल फोनचा जास्त वापर करणे हा देखील एक आजार मानला जातो. आज आम्ही तुम्हाला नोबोफोबियाबद्दल सांगणार आहोत. हा नोमोफोबिया म ोबाईल फोनच्या अतिवापरामुळे होतो.

काय आहे नोमोफोबिया

आजकाल प्रत्येकजण मोबाईल फोन आणि इंटरनेट वापर करतो. पण आपल्यापैकी काही लोक वारंवार फोनवर असून सतत मोबाईलमध्ये व्यस्त असतात. इतकंच नाही तर नेटवर्क आणि इंटरनेटच्या कमतरतेमुळे अनेक वेळा काही लोकांना अस्वस्थ वाटू लागतं. या अस्वस्थतेला आणि तणावाला नोमोफोबिया म्हणतात. सोप्या भाषेत नो-म ोबाइल-फोबिया म्हणजे मोबाईल नसण्याची भीती.

तज्ज्ञांच्या मताप्रमाणे, नोमोफोबिया ही एक मानसिक स्थिती आहे. ज्यावेळी एखादा व्यक्ती या फोबियाने ग्रस्त असतो तेव्हा लोकं त्यांच्या स्मार्टफोन किंवा डिजिटल गॅझेटपासून दूर असतात, किंवा कमी बॅटरी किंवा इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता असतात. यावेळी त्या संबंधित व्यक्तीला चिंता, अस्वस्थता आणि भीती वाटू लागते.

काय आहेत नोमोफोबियाचे लक्षणे

नोबोफोबियाचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे नेटवर्क नसलेल्या भागात जाण्याची भीती. नोबोफोबियाने ग्रस्त असलेले लोक ज्या ठिकाणी नेटवर्क नाही अशा ठिकाणी जाण्यास घाबरतात. याशिवाय फोन जवळ असताना बॅटरी संपून जाण्याची त्यांना सतत चिंता लागलेली असते. याशिवाय नेटवर्क नसणं, फोन वारंवार तपासणं, फोनला स्वत:पासून दूर ठेवण्यात अडचण येणं आणि इंटरनेट कनेक्शन नसताना चिंताग्रस्त होणं ही देखील नोबोफोबियाची लक्षणे आहेत.

## मोफत शिक्षणातील विसंगती दूर करा - अभाविप



निलंगा/ प्रतिनिधी: अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे निवेदन सादर, मुलींसाठी जाहीर करण्यात आलेली मोफत शिक्षण योजना प्रत्यक्षात सर्व स्तरांवर लागू न झाल्याची तक्रार पुढे आली आहे. शासनाच्या परिपत्रकातील तरतुदी आणि महाविद्यालयांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्कामध्ये मोठी तफावत असून अनेक ठिकाणी केवळ ट्यूशन फीच माफ केली जात आहे. त्यामुळे ही योजना पूर्णपणे मोफत नसून विद्यार्थिनींमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. योजनेची अंमलबजावणी शासन परिपत्रकानुसार काटेकोरपणे करावी, अशी मागणी अभाविप तर्फे करण्यात येत आहे. दरम्यान, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्रलंबित भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडलेली असून ती तातडीने पूर्ण करण्याचीही मागणी पुढे आली आहे. तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या युगात अनेक महाविद्यालयांत संगणक, इंटरनेट, ई-लर्निंग सुविधा आणि प्रशिक्षित शिक्षकांची तीव्र कमतरता जाणवत आहे. त्याचबरोबर आयटीआय महाविद्यालयातील प्रात्यक्षिक उपकरणे जीर्ण झाली असून इमारतीही कोसळण्याच्या स्थितीत आल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नवीन इमारतींचे बांधकाम, अत्याधुनिक उपकरणे आणि आवश्यक सुविधा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात, अशी एकमुखी मागणी व्यक्त होत आहे.

## शाही जीरा कसा खावा, जाणून घ्या

# काळ्या जिऱ्याचे ६ फायदे आणि ५ तोटे

काळे जिरे: काळे जिरे, ज्याला रॉयल जिरे असेही म्हणतात, त्याच्या औषधी गुणधर्मांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. त्याचे वैज्ञानिक नाव बुनियम पर्सिकम आहे. सामान्य स्वयंपाकघरातील जिर-पेक्षा ते पातळ, गडद आणि अधिक सुगंधी असते. कधीकधी त्याला काळे जिरे असेही म्हणतात. वाचकांचे आरोग्य लक्षात घेऊन, काळ्या जिरेचे प्रमुख फायदे आणि तोटे येथे आहेत:जास्त टोमॅटो खाल्ल्याने हा आजार होऊ शकतो, कोणी खाऊ नये जाणून घ्या काळ्या जिऱ्याचे ६ आश्चर्यकारक फायदे १.वजन कमी करण्यास मदत करते : काळे जिरे चयापचय गतिमान करतात आणि अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत करतात. वजन कमी करण्यासाठी दररोज त्याचे पाणी



पिणे प्रभावी मानले जाते. २. पचनसंस्थेसाठी रामबाण उपाय: काळे जिरे पोटफुगी, गॅस, बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्यांवर खूप आराम देते. बियांमधील तेल पाचक एंजाइम सक्रिय करते.३. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे: यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, ज्यामुळे तुम्ही वारंवार आजारी पडत नाही.

४. मधुमेह नियंत्रण: संशोधनातून असे दिसून आले आहे की काळे जिरे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकते. ते शरीराची इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारते.-ङडज ठए-ऊ हिवाळ्यात रोग प्रतिकारक शक्ती वाढवणारे या पदार्थाचे सेवन करा ५. त्वचा आणि केसांसाठी: काळ्या जिऱ्यामध्ये व्हिटॅमिन ई आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. त्याचे तेल चेहरा उजळवण्यासाठी आणि केस गळती रोखण्यासाठी वापरले जाते. ६. श्वसनाच्या आजारांपासून आराम: काळे जिरे खाल्ल्याने फुफ्फुसांचा दाह कमी होतो आणि दमा, ब्राँकायटिस आणि जुनाट खोकल्यासाठी श्वास घेणे सोपे होते.

# संतुलित दिनचर्या-आनंदी जीवनाचे रहस्य



अजित बी. खाडिलकर, सचिव,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

देवाने आपल्यापैकी प्रत्येकाला दिवसाचे समान २४ तास दिले आहेत. आठवड्यातील प्रत्येक दिवस, महिना आणि वर्ष या काळात आपल्याला आपल्या नोकरीच्या स्वरूपानुसार नियमित दिनचर्या पाळावी लागते. दिवसाचे योग्य संतुलीत काम, आपले छंद, आवडी आणि शेवटी विश्रांती व झोप यामध्ये असणे आवश्यक आहे. ही दिनचर्या प्रत्येकाने नियमितपणे पाळली पाहिजे. आपल्या जीवनातील यश किंवा अपयश हे आपण प्रत्येक दिवसाचे व्यवस्थापन कसे करतो यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यशस्वी आणि अयशस्वी व्यक्तींमधील फरक फार सूक्ष्म असतो आणि तो फक्त आपण दिवसातील २४ तास कसे घालवतो यावर ठरतो.आपल्या दैनंदिन जीवनात ८ + ८ + ८ हे सूत्र सर्वांनी पाळले पाहिजे. दिवसाचे तीन समान भाग प्रत्येकी ८ तासांचे करणे आवश्यक आहे. पहिले ८ तास आपण आपल्या कार्यस्थळी घालवतो, जे आपल्या उपजीविकेचे व आर्थिक आधाराचे मुख्य साधन आहे. पुढील ८ तास वैयक्तिक जीवन, कुटुंब, मित्र, आरोग्य, नाती, छंद यासाठी असावेत. शेवटचे ८ तास केवळ विश्रांती व शांत झोपेसाठी असावेत.या तीनपैकी कोणत्याही एका वेळेत जरी थोडा अडथळा आला, तरी त्याचा परिणाम लगेच पुढील वेळेवर दिसून येतो. आपला प्रयत्न असा असावा की प्रत्येक ८ तास अर्थपूर्ण, ओळख निर्माण करणारे आणि आठवणीत राहणारे असावेत.नोकरीतील ८ तास अत्यंत महत्त्वाचे असतात.

या काळात आपल्याला सहकारी, पुरवठादार, विविध संस्था व वरिष्ठांशी संवाद साधावा लागतो. प्रत्येकाशी संतुलन राखण्यासाठी वेगळी कौशल्ये आवश्यक असतात.

कार्यस्थळी आपण प्रामाणिक, वेळेचे पालन करणारे, निष्ठावान, परिपक्व, शांत, जबाबदार, उपयुक्त, विश्वासार्ह, सहकार्यशील, व्यावसायिक, नम्र, योग्य पोशाख पाळणारे, गॉसिप टाळणारे व पुढाकार घेणारे असलो, तर कार्यस्थळावरील वेळ निश्चितच संस्मरणीय व फलदायी ठरेल.

वरील गुणधर्म हळूहळू पण, निश्चितपणे विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकदा हे जीवनपद्धती म्हणून स्वीकारले की त्याचे लाभ अमूल्य असतात. आपल्याला केवळ इतरांकडूनच नव्हे तर स्वतःकडूनही आदर मिळतो आणि संस्थेतील प्रगती वेगाने होते.

नोकरीनंतरचा वेळ हा गुणवत्तापूर्ण असावा. या वेळेत नाती, कुटुंब, मित्र, छंद, खेळ, संगीत, चालणे, फिटनेस, आवड, स्वतःची काळजी, टी.व्ही., सोशल मीडिया, मोबाईल यासाठी वेळ द्यावा. आपल्या जीवनशैली, कुटुंब, संस्कार व संस्कृतीनुसार यापैकी काही गोष्टी हळूहळू विकसित करता येतात. या छंदांमुळे समाधान, अंतरिक आनंद आणि एकूणच विश्रांती व संतुलन मिळते. मैत्रीभाव, करुणा, आनंद व समत्व दाखवल्याने आनंद प्राप्त होतो. मन शांत, तणावमुक्त आणि शारीरिक व मानसिक शांततेत असेल तेव्हा विश्रांती मिळते. योग, ध्यान, प्राणायाम आणि एकांत यामुळे मन व शरीराला नेहमीच आराम मिळतो. वरील दिनचर्येसोबतच चांगल्या सवयी, योग्य आहार, काळजी आणि देवप्रार्थनेसाठी वेळ काढल्यास आपल्या जीवनातील प्रत्येक दिवस संस्मरणीय बनेल. चला, आपण सर्वजण ८ + ८ + ८ या सुवर्णनियमाचे पालन करूया आणि त्याचे लाभ मिळवूया.

आनंदी जीवनासाठी चार नियम...

नेहमी कृतज्ञता व्यक्त करा

यशाची स्वतःची व्याख्या ठरवा

आपल्या नियंत्रणातील गोष्टींवर लक्ष केंद्रित करा

शेवटचे ८ तास

# न्याय प्रक्रिया अति महत्त्वाची

गो रक्षकांविरुद्धचे किती खटले देशातील न्यायालयांसमोर पडून आहेत त्याची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही; पण जमावाकडून होणार्‍या हत्या रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. खुनाचा आरोप असलेल्या आरोपींवरील सर्व आरोप रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज न्यायालयाने फेटाळला ही आश्वासक घटना आहे. उत्तर प्रदेशाच्या सरकारने हा अर्ज केला होता. २०१५ मध्ये बिसादा गावात महमद अखलाक नामक व्यक्तीची समूहाने ठेचून हत्या केली होती. त्याने गायीच्या बछड्याची हत्या करून घरात ते मांस ठेवले असल्याच्या 'संशयावरून' समूहाने अखलाकला संपवले होते. त्याच्या शेजार्‍यांसह १० जणांवर त्याची हत्या केल्याचा आरोप आहे. तो रद्द करण्याची मागणी उत्तर प्रदेश सरकारने केली होती. या अर्जास कोणताही आधार नाही असे निरीक्षण नोंदवत तो अर्ज न्यायालयाने फेटाळला आणि 'अत्यंत महत्त्वाचे' अशी या प्रकरणाची नोंद करण्याचे निर्देशही दिले. 'सर्व पुराव्यांना' संरक्षण पुरवण्याचे आदेशही या न्यायालयाने संबंधित पोलिस ठाण्यास दिले आहेत. न्यायालयाने ज्याचे वर्गीकरण 'पुरावे' असे केले आहे, त्यात साक्षीदारही समाविष्ट असणार हे गृहीत आहे. न्यायालयाचे हे पाऊलही स्वागतार्ह आहे. गेल्या १५ ऑटोबर रोजी राज्य सरकारने हा अर्ज केला होता. खुनाच्या प्रकरणात अडकलेल्या व्यक्तींवरील आरोप मागे घेण्याची मागणी राज्य सरकारने करावी हे चमत्कारिक आहे. त्यातून आपल्या विचार व वर्तनातील विसंगती स्पष्ट होते हे सरकार विसरलेले दिसते.

**हल्लेखोरांना बळ**

अखलाकच्या हत्येची घटना २८ सप्टेंबर २०१५ रोजी घडली होती. जमावाने त्याला घरातून ओढत बाहेर नेले व मारहाण करून त्याची हत्या केली होती. या हल्ल्यात महमद अखलाक याचा मुलगा गंभीर जखमी झाला होता. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात स्थापन होऊन जेमतेम सवा वर्ष उलटले होते. या घटनेनंतर 'गो रक्षक' ही संकल्पना व शब्द प्रयोग देशभर प्रचलित झाला. गो मांस विकणे किंवा घरात ठेवणे अशा संशयावरून गो रक्षकांनी केलेल्या हल्ल्यात नेमके किती बळी गेले याची अधिकृत सरकारी आकडेवारी उपलब्ध नाही; पण २०१० ते २०१७ या काळात गो रक्षकांच्या हल्ल्यात २८ जण मारले गेले, त्यापैकी ९७ टक्के मृत्यू मोदी सरकारच्या स्थापनेनंतर झाले असे एका विश्लेषणातून समोर आले आहे. मे २०१५ ते डिसेंबर २०१८ या काळात १२ राज्यांमध्ये गो रक्षकांच्या हल्ल्यात किमान ४४ जण



मरण पावल्याचे अन्य एक अभ्यास सांगतो. २०१६ ते २०२० च्या अखेरीपर्यंत समूहाच्या हल्ल्यात ५० जणांना प्राण गमवावे लागल्याचे अन्य एका अहवालात म्हटले आहे. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालीही भाजप सत्तेत होता, मात्र त्या काळात अशा घटना मोठ्या प्रमाणावर घडल्याची नोंद नाही. मोदी सत्तेत आल्यावर अमित शहा गृहमंत्री झाल्यावर गो रक्षकांचे हल्ले वाढल्याचे उपलब्ध माहितीवरून दिसते. भाजप किंवा त्यांच्याशी संबंधित संस्था-संघटनांच्या नेत्यांनी या हल्ल्यांचे समर्थन तरी केले आहे किंवा त्याकडे दुर्लक्ष केले असेही जाणवते. अखलाकच्या हत्येचा आरोप असलेल्यांपैकी दोन जणांनी २०१७ मध्ये जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला होता. त्या प्रकरणातील एक मुख्य साक्षीदार, अखलाकची पत्नी, हिच्या जबाबात विसंगती असल्याचे कारण त्यासाठी त्यांनी दिले होते. तेव्हा राज्य सरकारने त्यांना जामीन मंजूर करण्यास विरोध केला होता. आता जबाबातील विसंगती हेच कारण पुढे करत राज्य सरकार सर्व आरोपींवरील सर्व आरोप रद्द करण्याची मागणी करत आहे, हे अभूतपूर्व आहे. ही मागणी दिशाभूल करणारी व राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे अखलाकच्या पत्नीने म्हटले आहे, तिकडे दुर्लक्ष करता येणार नाही. 'खून हा समाजाविरुद्धचा गंभीर गुन्हा आहे आणि समाजात कायदा व सुव्यवस्थेची जरब बसावी यासाठी सरकार असे खटले चालवते' असे निरीक्षण न्यायालयाने अर्ज फेटाळताना नोंदवले ते महत्त्वाचे आहे. लवकरच या खटल्याची नियमित सुनावणी सुरू होईल तो किती काळ चालेल ते सांगता येत नाही. मात्र पीडितांचे म्हणणे ऐकून घेतले जावे व न्याय प्रक्रियेला महत्त्व मिळावे हे न्यायालयाच्या निर्णयाने अधोरेखित झाले आहे.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



**ग्रीन टी**-जेव्हा मोठया प्रमाणात स्वास्थ्य लाभ हवा असेल आणि तो कशानी मिळेल असा जर कुणी प्रश्न केला तर सर्वात वरच्या क्रमांकावर ग्रीन टीचे नाव येईल. ग्रीन टी तुम्हाला सुंदर बनवते. कॅंसर पासुन दुर ठेवते शिवाय तुमच्या त्वचेला स्वच्छ देखील ठेवते आणि तुमच्या चेहे-याला लागणा-या आवश्यक तत्वांनाही पुर्ण करते.जे लोक सतत ३ महिने ग्रीन टी चे सेवन करतात त्यांची त्वचा ग्रीन टी चे सेवन न करणा-यांच्या तुलनेत जास्त मुलायम स्वस्थ आणि कोमल असते. आणि हे सर्व याकरता होतं कारण यात महत्व-पुर्ण तत्व जसे कैटेचीन, एत्रछत्र असतात जे आपल्या शरीरात ऑक्सीजनच्या प्रवाहाला वाढवतात आणि त्वचेत रक्ताच्या कमतरतेला भरून काढतात.



**(क्रमश. )**

## विनोद




बगारामला एकदा एका जुन्या पडक्या इमारतीत रात्र घालविण्याचा प्रसंग आला. वॉचमनला बगारामने विचारले, काय रे बाबा, इथे या खोलीत काही विशेष घटना घडली आहे का ? गेल्या २५ वर्षात तरी नाही घडलेली वॉचमन म्हणाला, म्हणजे २५ वर्षांपुर्वी काय विशेष घडले होते ? बगारामने उत्सुकतेने विचारले. वॉचमन म्हणाला, २५ वर्षापूर्वी एक माणूस इथे याच खोलीत रात्रभर राहिला आणि सुखरुप घरी निघून गेला होता.

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?

Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार



प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.


– पु.ल. देशपांडे

**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### एका ओव्हरमध्ये ५ विकेट्स, पठ्ठ्याने रचला अशक्य पराक्रम, सगळेच चक्रावले

मुंबई -क्रिकेटच्या मैदानात क्वचितच असे क्षण येतात, जे खेळाच्या सुवर्णपानांवर कायमचे कोरले जा-तात. बाली येथे खेळल्या गेलेल्या एका टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात असाच एक ऐतिहासिक क्षण पाहायला मिळाला. इंडोनेशियाचा युवा वेगवान गोलंदाज गेडे प्रियांदना याने अशक्य वाटणारा पराक्रम करून दाखवत क्रिकेटविश्वाला थक्क केले. एका ओव्हरमुळे प्रियनदानाचे नाव अशा विक्रमांच्या पानावर कोरले गेले आहे, जिथे आजवर जगातील मोठमोठे दिग्गज गोलंदाजही पोहोचू शकले नव्हते.

### १४ वर्षाच्या पोराचं वादळ! २०२५ मध्ये गाजला फक्त वैभव सूर्यवंशी

मुंबई -वैभव सूर्यवंशी, हे नाव २०२५ मध्ये तुफान चर्चेत राहिलं. वर्तमानपत्र, टीव्ही किंवा सोशल मीडिया, पाहाल तिथे वैभव सूर्यवंशीच झळकत होता. क्रिकेटचं मैदान असो की गुगल सर्च, वैभव पहिल्या क्रमांकावर टिकून राहिला. कोणीतरी १४ वर्षाचा पोरगा आहे, खूप मोठे फटके मारतो. हा पोरगा आहे तरी कोण? हे शोधून काढण्यासाठी लोकांनी गुगलवर भरभरून सर्च केलं. गुगलवर सर्वाधिक सर्च केल्या गेलेल्या खेळाडूंच्या यादीत तो भारतात पहिला, तर जगात सहाव्या क्रमांकावर राहिला. वयाच्या १४ व्या वर्षी आयपीएल पदार्पण करून वेगवान शतक झळकावून दणक्यात सुरूवात करणाऱ्या वैभवने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १९० धावांची खेळी करून वर्षाचा शेवट केला आहे.

### तेम्बा बावूमाचा मोठा खुलासा! 'बुटका' म्हटल्यानंतर नेमके काय घडले होते? म्हणाला, ''बुमराह आणि पंतने''

मुंबई -भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये काही दिवसांपूर्वी कसोटी मालिकेचा थरार पार पडला. दोन्ही संघ २ कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी आमनेसामने आले होते. या मालिकेत भारतीय संघाला २-० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे या पराभवाची चांगलीच चर्चा रंगली. पण आणखी एक मुद्दा तुफान चर्चेत राहिला, तो म्हणजे जसप्रीत बुमराहने तेम्बा बावूमाला चिडवल्याचा मुद्दा. या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान जसप्रीत बुमराह आणि ऋषभ पंतने तेम्बा बावूमाला बौना (बुटका)म्हणून चिडवलं होतं. त्यावेळी हा मुद्दा तुफान चर्चेत राहिला होता. आता तेम्बा बावूमाने नेमकं काय घडलं होतं, याबाबत मोठा खुलासा केला आहे.बुमराहने टाकलेला चेंडू तेम्बा बावूमाच्या पॅडला जाऊन लागला होता. त्यावेळी डीआरएस घेण्यावरून खेळाडूंमध्ये चर्चा सुरू होती. त्याचवेळी बुमराह तेम्बा बावूमाला बुटका म्हणाला होता.

### विराट-रोहितच्या तुफान फलंदाजीने बीसीसीआय ला भरली धडकी... आता क्रिकेटचा 'तो' नियमच बदलणार?

मुंबई -विजय हजारे ट्रॉफीची या वर्षी जरा जास्तच चर्चा आहे. त्यासाठी कारणही तसं खास आहे. भारतातील ए लिस्टेड खेळाडू या स्पर्धेमध्ये खेळत असून त्यांना पाहण्यासाठी मैदानात तुफान गर्दी झाल्याचं स्पर्धेच्या पहिल्या दिवशीच दिसून आलं. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी रोहित शर्माने दमदार शतक झळकावलं. त्याने ६२ चेंडूंमध्ये ही कामगिरी केली. तर दुसरीकडे विराट कोहलीनेही ८४ चेंडूंमध्ये शतक झळकावत चाहत्यांना खुश केलं. अनेक वर्षांनंतर हे दोघे या स्थानिक स्पर्धेत खेळत आहेत. पहिल्याच दिवशी अनेक विक्रम मोडले गेले. अगदी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीपासून ते विराट, रोहित सर्वांच्या बॅटमधून धावांचा पाऊस पडला. मैदानात तुफान गर्दी-भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि भारताचा

## गोलंदाजांच्या क्रमवारीत बुमराहची १० स्थानांची झेप

# बुमराहला मागे टाकत हा खेळाडू पहिल्या स्थानी

| खेळाडू | सामने | डाव | षटक | मेडन | धावा | विकेट | सर्वश्रेष्ठ | ५ विकेट्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मोहम्मद सिराज | १० | १९ | ३११.३ | ४५ | ११७० | ४३ | ६-७० | २ |
| जसप्रीत बुमराह | ८ | १४ | २४३.३ | ५२ | ६८७ | ३१ | ५-२७ | ३ |
| रवींद्र जडेजा | १० | १८ | २९७.४ | ४१ | ९५५ | २५ | ४-५० | ० |
| कुलदीप यादव | ४ | ८ | १३३.२ | १७ | ४६३ | २० | ५-८२ | १ |
| प्रसिद्ध कृष्णा | ४ | ८ | १३२ | १० | ६२६ | २० | ४-६२ | ० |
| आकाश दीप | ३ | ६ | १०९.१ | १४ | ४७४ | १३ | ६-९९ | १ |
| वॉशिंग्टन सुंदर | ९ | १४ | १७० | २२ | ५५७ | ११ | ४-२२ | ० |
| नितीश कुमार रेड्डी | ६ | ८ | ५१ | २ | २१८ | ५ | २-३२ | ० |
| अक्षर पटेल | १ | २ | २० | २ | ५७ | २ | १-२१ | ० |
| शार्दुल ठाकुर | २ | ३ | २७ | ० | १४४ | २ | २-५१ | ० |

मुंबई-भारताच्या कसोटी संघासाठी २०२५ हे वर्ष फारसं चांगलं राहिलं नाही. वर्षाच्या सुरूवातीलाच ऑस्ट्रेलियाविरूद्ध संघाला बॉर्डर गावस्कर ट्रॉफी मालिकेत पराभवाला सामोरं जावं लागलं. यानंतर संघातील दिग्गज खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेटला अचानक अलविदा करत सर्वानाच धक्का दिला. यानंतर शुबमन गिल संघाचा नवा कर्णधार ठरला. यादरम्यान काही खेळाडूंनी भारतासाठी कसोटीत चांगली कामगिरी केली. पण यंदा कसोटीत सर्वाधिक विकेट्स बुमराहच्या नावावरून नसून वेगळ्याच गोलंदाजाने बाजी मारली आहे.

ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर जसप्रीत बुमराहला दुखापत झाली. या दुखापतीमुळे बुमराह बराच काळ भारतीय संघातून बाहेर होता. यादरम्यान भारताच्या गोलंदाजी विभागाची जबाबदारी मोहम्मद सिराजच्या खांद्यावर होती आणि जी त्याने चोख पार पाडली. यासह मोहम्मद सिराजने भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत.

कसोटी विकेट्समध्ये मोहम्मद सिराजने या वर्षी जसप्रीत बुमराहला मागे टाकलं. सिराजने बुमराहपेक्षा दोन जास्त सामने खेळले असले तरी, यादरम्यान सिराजने सर्वोत्तम गोलंदाजी केली हे नाकारता येत नाही. सिराजने या वर्षी १० सामन्यांमध्ये एकूण ४३ विकेट्स घेतल्या, ज्यामुळे तो मिचेल स्टार्कनंतर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा दुसरा गोलंदाज आहे. बुमराह जागतिक यादीत पाचव्या स्थानावर आहे, तर मिचेल स्टार्कने २०२५ मध्ये १० सामन्यांमध्ये ५१ विकेट्सह सर्वाधिक कसोटी विकेट्स घेतल्या आहेत. या वर्षी स्टार्कला इंग्लंडविरुद्ध आणखी एक कसोटी खेळायची आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील बॉक्सिंग डे ॲशेस कसोटी २६ डिसेंबरपासून सुरू होत आहे.



२०२५ मध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारे भारतीय गोलंदाज

गोलंदाजांच्या क्रमवारीत भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने १० स्थानांची झेप घेतली आहे. बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसी क्रमवारीत बुमराह १८व्या स्थानावर पोहोचला आहे. त्याचे ६२२ रेटिंग गुण आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात बुमराहने २ बळी घेऊन भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

भारताने ही मालिका ३-१ ने जिंकली होती, तर लखनऊमध्ये खेळला गेलेला चौथा सामना धुक्यामुळे रद्द करावा लागला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या निर्णायक सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २३१ धावांचा मोठा डोंगर उभा केला. या सामन्यात तिलक वर्माने ४२ चेंडूत ७३ धावांची धमाकेदार खेळी केली. या शानदार कामगिरीनंतर तिलक वर्माने श्रीलंकेच्या पथुम निसांकाला मागे टाकत ८०५ रेटिंग गुणांसह फलंदाजांच्या क्रमवारीत तिसरे स्थान पटकावले. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या डेवाल्ड ब्रेविसलाही त्याच्या कामगिरीचा फायदा मिळाला. त्याने वेगवान ३१ धावांची खेळी केली, ज्यामुळे त्याने पाच स्थानांची झेप घेऊन टॉप-१० फलंदाजांमध्ये स्थान मिळवले.
टी-२० बॉलर्स रँकिंगमध्ये भारताच्या वरुण चक्रवर्तीने आपले अव्वल स्थान आणखी मजबूत केले आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत तो सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आणि त्याने एकूण १० बळी घेतले. तो दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडच्या जेकब डफीपेक्षा खूप पुढे आहे. टी-२० बॅटर्स रँकिंगमध्ये अभिषेक शर्मा नंबर वनवर आहे. इंग्लंडचा सलामीवीर फिल सॉल्ट दुसऱ्या स्थानावर कायम आहे. तर ८०५ रेटिंग पॉइंट्ससह तिलक वर्मा तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

## विजय हजारे ट्रॉफीमध्ये विराट कोहली आणि रोहित शर्मा कधी आणि कोणत्या संघाविरुद्ध खेळतील?

मुंबई-भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात मोठी वनडे स्पर्धा असलेल्या विजय हजारे ट्रॉफीच्या नवीन हंगामाची सुरुवात २४ डिसेंबर रोजी धमाकेदार झाली. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी शतकांची भर पडली. एकूण २२ शतकं नोंदवली गेली, ज्यात माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या शानदार शतकांचा समावेश आहे.रोहितचं आक्रमक शतक : दीर्घ विश्रांतीनंतर विजय हजारे ट्रॉफीमध्ये परतणाऱ्या रोहित शर्मानं मुंबईसाठी धमाकेदार शतक झळकावलं. जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर सिक्कीमविरुद्ध रोहित शर्मानं धमाकेदार शतक झळकावलं. त्यानं फक्त ६२ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं, त्यातील ८० धावा चौकारांनी आल्या. हे त्याचं लिस्ट ए क्रिकेटमधील ३७ वं शतक



होते. रोहितच्या शानदार १५५ धावांच्या खेळीत १८ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता. हिटमनच्या धमाकेदार शतकामुळं मुंबईनं सिक्कीमला ८ गडी राखून पराभूत केले. विराटचीही शतकी खेळी : रोहितप्रमाणेच, विजय हजारे ट्रॉफीच्या पहिल्या दिवशी विराट कोहलीच्या बॅटनंही चमकदार कामगिरी केली. दिल्लीसाठी दीर्घ विश्रांतीनंतर देशांतर्गत वनडे क्रिकेटमध्ये परतणाऱ्या विराट कोहलीनं चाहत्यांना रोमांचित केलं. त्यानं बेंगळुरुमध्ये आंध्रविरुद्ध ८३ चेंडूत शतक पूर्ण केलं, जे लिस्ट-ए क्रिकेटमधील त्याचं ५८ वं शतक आहे. या शतकासह कोहली सचिन तेंडुलकरच्या लिस्ट-ए क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं ठोकण्याच्या विश्वविक्रमाच्या (६०) जवळ पोहोचला. विराटच्या शतकामुळं दिल्लीनं आंध्रचा ४ विकेट्सनं पराभव केला. रोहित-विराट पुढचा सामना कधी आणि कोणत्या संघाविरुद्ध खेळणार? : विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ च्या त्यांच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या कामगिरीनं चाहत्यांच्या अपेक्षा वाढवल्या आहेत. चाहते त्यांच्या पुढच्या सामन्यात दोन्ही दिग्गज खेळाडूंच्या आगमनाची आतुरतेनं वाट पाहत आहेत.

## लग्न मोडल्यानंतर घेतला स्मृती मानधनने आयुष्यात मोठा निर्णय

मुंबई-भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू स्मृती मानधना मागील काही दिवसांपासून तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. स्मृतीचे लग्न संगीत दिग्दर्शक पलाश मुच्छलशी होणार होते. हे लग्न मोडल्याचे स्वत: स्मृतीने जाहीर केले आहे. या विषयावर जास्त न बोलता तिने ममाझ्यासाठी हा विषय बंद झाला आहेफ अशी पोस्ट केली. यानंतर क्रिकेट खेळण्यात रमलेली स्मृती आता मद ग्रेट इंडियन कपिल शोफमध्ये गैरहजर राहणार आहे. स्मृतीच्या अनुपस्थितीवरुन उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. लग्न मोडल्यानंतर स्मृतीने कोणत्या कार्यक्रमाला जावे आणि कोणत्या टाळावे याचा निर्णय विचारपूर्वक घ्यायला सुरुवात केली आहे. खासगी आयुष्यावर सार्वजनिक ठिकाणी चर्चा होण्याची शक्यता गृहित धरून स्मृतीने कार्यक्रमाला गैरहजर राहण्याचा निर्णय घेतला आहे. पण कार्यक्रमातील संभाषणात स्मृतीचा उल्लेख असेल आणि चांगल्या हेतूनेच असेल. कॉमेडी आणि क्रिकेटचा अनोखा संगम या विकेंडला मद ग्रेट इंडियन कपिल शोफच्या चौथ्या सीझनच्या नव्या एपिसोडमध्ये कॉमेडी आणि क्रिकेटचा अनोखा संगम पहायला मिळेल. नुकताच नोव्हेंबर २०२५ मध्ये भारतीय महिला क्रिकेटपटूंनी आयसीसी विश्वचषक जिंकून इतिहास रचला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी पराभूत केले होते आणि आता विजयाची उत्सव कपिल शर्मांच्या स्टेजवर हास्यविनोदासह



### वैभव सूर्यवंशीची सचिनसोबत तुलना! वक्तव्यामुळे खळबळ

दिल्ली-भारतीय क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा एका खळबळ माजवली आहे. काही अल्पवयीन खेळाडूने स्वत:विषयी प्रचंड चर्चा निर्माण करायला भाग पाडलं आहे. गेल्या काही काळापासून वैभव सूर्यवंशी हे नाव खूप कौतुक मिळवत आहे. त्याची खूप चर्चा आहे कारण तो असा खेळ दाखवत आहे की त्याची दखल घेणे भाग पाडत आहे. बिहारचा अवघा १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने विजय हजारे ट्रॉफीत केलेल्या ऐतिहासिक खेळीमुळे संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे.

रोहित भाई... वडा पाव खाशील का?

## स्टेडियममध्ये एका चाहत्याने विचारताच हिटमॅनने दिले मजेदार उत्तर

जयपूर-टीम इंडियाचा स्टार फलंदाज रोहित शर्मानं सात वर्षांच्या अनुपस्थितीनंतर विजय हजारे ट्रॉफीमध्ये पुनरागमनाचा आनंद घेतला. २४ डिसेंबर रोजी जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर मुंबईनं सिक्कीमवर केलेल्या दणदणीत विजयानं उत्साह आणि मनोरंजनाची कमतरता भासली नाही. सामन्यात 'हिटमॅन'नं फक्त ९४ चेंडूत १५५ धावा फटकावल्या आणि मुंबईला ८ विकेटनं विजय मिळवून दिला. मात्र, हा सामना इतर अनेक कारणांमुळं चर्चेचा विषय बनला आहे.
मैदानात 'रोहित-रोहित'च्या घोषणा : जेव्हा सिक्कीमनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेव्हा रोहित अनेक वेळा सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करताना दिसला आणि सर्वत्र 'रोहित-रोहित'च्या घोषणा ऐकू आल्या.
'हिटमॅन'ची एक झलक पाहण्यासाठी प्रत्येकजण उत्सुक दिसत होता. जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियममध्ये २०,००० हून अधिक लोक उपस्थित होते. या दरम्यान रोहितसोबत एक मजेदार घटना घडली.
वडा पाव खाणार का? : स्टेडियममधील गोंधळात, एका चाहत्यानं विनोदानं विचारलं, ''रोहित भाई... वडा पाव खाशील का?'' सीमारेषेवर उभ्या असलेल्या 'हिटमॅन'नं नम्रपणे पण विनोदी पद्धतीनं हात हलवला. हा छोटासा क्षण कॅमेऱ्यात कैद झाला आणि स्टँडमधील प्रेक्षक हसल्याशिवाय राहू शकले नाहीत.




वडा पावचा प्रश्न का? : वडा पाव हा मुंबई आणि महाराष्ट्राच्या स्थानिक खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. 'हिटमॅन' हा देशाच्या आर्थिक राजधानीचा असल्यानं, चाहते अनेकदा त्याला यासोबत जोडतात. रोहित शर्माला यापूर्वी वडा पाव खाताना पाहिलं गेले आहे आणि असे दिसते की त्याला वडा पाव खूप आवडते.
रोहित शर्माची १५५ धावांची खेळी : रोहित शर्मानं सिक्कीमविरुद्धच्या सामन्यात १५५ धावांची शानदार खेळी केली. रोहितनं या डावात ९४ चेंडूंचा सामना केला, त्यात १८ चौकार आणि ९ षटकार मारले. रोहित शर्माच्या दमदार फलंदाजीमुळं मुंबईनं सिक्कीमवर ८ विकेटनं विजय मिळवला. सिक्कीमविरुद्धच्या या सामन्यात रोहित व्यतिरिक्त अंगक्रिश रघुवंशीनं ५८ चेंडूत ३८ धावा केल्या. मुशीर खाननंही २६ चेंडूत २७ धावा केल्या.
सरफराज खान ८ धावांवर नाबाद राहिला.

# विजय हजारे ट्रॉफी:खेळाडूंच्या सुरक्षेसाठी प्रेक्षकांनाच सामना पाहण्यास बंदी!

### विराट कोहली १५ वर्षांनी विजय हजारे ट्रॉफी खेळणार

नवी दिल्ली : येत्या २४ डिसेंबरपासून देशातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्पर्धांपैकी एक असलेल्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेला सुरुवात होणार आहे. भारतीय संघात खेळत असलेल्या खेळाडूंनाही ही स्पर्धा खेळणे बंधनकारक आहे. त्यामुळे विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे खेळाडू देखील ही स्पर्धा खेळताना दिसून येणार आहेत. विराट दिल्लीकडून, तर रोहित मुंबईकडून खेळताना दिसणार आहे. विराट कोहली बंगळूरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर पुनरागमन करणार आहे. मात्र क्रिकेट चाहत्यांना त्याला खेळताना पाहण्याची संधी मिळणार नाही. हा सामना बंद दाराआड खेळवला जाणार असल्याची





माहिती समोर येत आहे.
कर्नाटक सरकारने कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केसीए) ला चिन्नास्वामी स्टेडियमवर विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील सामने प्रेक्षकांशिवाय आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. कर्नाटक क्रिकेट असोसिएशनने यातून मार्ग काढत स्टेडियममधील २ स्टँड जनतेसाठी खुले करण्याचा पर्याय शोधला होता. त्यामुळे २००० ते ३००० क्रिकेट चाहते हा सामना पाहण्यासाठी उपस्थित राहू शकत होते; परंतु कर्नाटक क्रिकेट सरकारने हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे.
इतरवेळी विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांना परवानगी दिली जाते. पण यावेळी विराट कोहली आणि ऋषभ पंत देखील खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे खेळाडूंच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.
दिल्लीचा पहिला सामना आंध्र प्रदेश संघाविरुद्ध होणार आहे. कोहली आणि पंत सोमवारी रात्री उशिरा बंगळूरुत दाखल झाले आहेत. या सामन्यापूर्वी विराट दिल्ली संघासोबत सराव करणार असल्याची अपेक्षा आहे. ४ जूनला आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू संघाने जेतेपदाला गवसणी घातली होती.
या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी चिन्नास्वामी स्टेडियमवर चेंगराचेंगरी झाली होती. त्यानंतर या मैदानावर एकही सामना झाला नव्हता. त्यामुळे महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेतील सामने देखील डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये हलवण्यात आले होते.

# महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणासाठी लातूर पोलिसांचा ‘भरोसा सेल’ विश्वास, समुपदेशन व कायदेशीर मदतीचे प्रभावी केंद्र

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार तसेच सामाजिक स्वरूपाच्या तक्रारींचे संवेदनशील व प्रभावी निराकरण करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर अंतर्गत कार्यरत असलेला ‘‘भरोसा सेल (महिला तक्रार निवारण केंद्र)’’ हा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. भरोसा सेलच्या माध्यमातून पीडित घटकांना समुपदेशन, मार्गदर्शन व आवश्यक ती कायदेशीर मदत विनामूल्य पुरवली जात असून, आजवर अनेक कुटुंबांतील वाद शांततेने मिटविण्यात या सेलने मोलाची भूमिका बजावली आहे.





**भरोसा सेलची उद्दिष्टे**

महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचारास प्रतिबंध करणे, कौटुंबिक वादांमध्ये संवादातून समेट घडवून आणणे, पीडितांना मानसिक आधार व कायदेशीर मार्गदर्शन देणे, समाजात कायदेविषयक जनजागृती करणे.

**भरोसा सेलची प्रमुख कार्ये.**

**समुपदेशन**

भरोसा सेल येथे प्रशिक्षित समुपदेशकांमार्फत पुढील बाबींवर समुपदेशन करण्यात येते पती–पत्नीमधील वाद, सासू–सुनेमधील मतभेद, कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ व कौटुंबिक तणाव, समुपदेशनाच्या माध्यमातून पती–पत्नी व कुटुंबातील सदस्यांमध्ये संवाद वाढवून समेट घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो.

**विवाहित महिलांसाठी विशेष कार्यवाही.**

विवाहित महिलांना त्यांच्या पती किंवा पतीचे नातेवाईक यांच्याकडून शारीरिक अथवा मानसिक छळ तसेच बेकायदेशीर हुंडा किंवा मालमत्तेची मागणी होत असल्यास, अशा महिलांना भरोसा सेलमध्ये अर्ज करता येतो. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार महिला व गैर–अर्जदार (पती/नातेवाईक) यांना समक्ष बोलावून समुपदेशन करण्यात येते. समुपदेशनानंतर समेट न झाल्यास, अर्जदार पत्नीस प्रचलित कायद्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाण्यास अभिप्राय पत्र दिले जाते. या प्रक्रियेसाठी वकील किंवा विधीज्ञ सोबत ठेवण्याची मुभा दिली जाते.विवाहित महिला माहेरी किंवा सासरी आपल्या सोईनुसार जवळच्या भरोसा सेल कार्यालयात अर्ज करू शकतात.

**महिला व बालकांचे संरक्षण**

महिलांवरील अत्याचाराच्या तक्रारी अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार (पोस्को कायद्यान्वये) बालविवाह प्रतिबंध,बाल तस्करी व इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे अशा प्रकरणांमध्ये पीडितांना तक्रार दाखल करणे, वैद्यकीय तपासणी व कायदेशीर कार्यवाहीसाठी संपूर्ण सहकार्य केले जाते.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी मदत**

आई–वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ अंतर्गत अपत्ये किंवा नातेवाईकांकडून सांभाळ न करणे, दुर्लक्ष, छळ अथवा परित्याग अशा प्रकरणांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना समुपदेशन, मार्गदर्शन व कायदेशीर मदत पुरवली जाते.,निर्वाह भत्ता मिळण्यासाठी संबंधित न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येतो. या कायद्यानुसार मा. उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) हे न्यायाधिकरण म्हणून नियुक्त असून त्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित दोषींना कारावास किंवा दंडाची शिक्षा होऊ शकते. सन २०२५ मधील कार्यवाहीचा आढावा. सन २०२५ मध्ये भरोसा सेलमध्ये एकूण ७२१ तक्रारी दाखल झाल्या. मा. पोलीस अधीक्षक व मा. अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेल येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी त्यापैकी १५४ प्रकरणांमध्ये समेट होऊन संसार पुन्हा नांदण्यास सुरुवात झाली, २५२ प्रकरणे समुपदेशनानंतर बंद करण्यात आली. २३३ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. एकूण ६३९ प्रकरणांची निर्गती करण्यात आली आहे.

**भरोसा सेल अंतर्गत मनोधैर्य योजना कार्य आणि कामगिरी**

लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यांच्या पीडितांसाठी महाराष्ट्र शासनाची ‘‘मनोधैर्य योजना’’ आर्थिक मदत, मानसिक आधार व पुनर्वसनाचे प्रभावी साधन. महिला व बालकांवरील बलात्कार, लैंगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यासारख्या अत्यंत गंभीर व संवेदनशील गुन्ह्यांमध्ये बळी पडलेल्या पीडितांना तात्काळ आधार व पुनर्वसन देण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत ‘‘मनोधैर्य योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पीडित महिला व बालकांना आर्थिक मदत, मानसिक आधार, कायदेशीर मदत व सामाजिक पुनर्वसन प्रदान करून त्यांना मानसिक आघातातून सावरण्यास व नव्याने आत्मविश्वासाने जीवन सुरू करण्यास मदत केली जाते. लातूर पोलिसाच्या भरोसा शून्य महत्त्वाची समन्वयकाची भूमिका बजावून ११ गुन्ह्यातील पिढीताना शासनाकडून १७ लाख ५० हजार रुपयाची आर्थिक मदत मिळवून दिली आहे.

**भरोसा सेल अंतर्गत दक्षता समिती यांचे मार्फतीने विशेष उपक्रम**

भरोसा सेल अंतर्गत भरोसा सेल येथील अधिकारी व अंमलदार यांनी महिला दक्षता समितीचे सदस्य यांचे समवेत शाळा कॉलेजे येथील किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करून बालकांचे सुरक्षा,अधिकार आणि हेल्पलाईन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

लातूर पोलिसांच्या भरोसासेल चे कामकाज वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे व त्यांची टीम चोखपणे पार पाडत आहे.

**लातूर पोलिसांचा नागरिकांना संदेश**

महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा छळ, अन्याय किंवा कौटुंबिक हिंसाचार सहन न करता निः संकोचपणे ‘‘भरोसा सेल’’शी आणि पोलीस हेल्प लाईन ११२ वर संपर्क साधावा.लातूर पोलीस आपल्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर आहेत.

## उच्चशिक्षित इंजिनिअर हिरकणी चे उपवर मुलींना मार्गदर्शन

**सोलापूर/प्रतिनिधी :** आजच्या आधुनिक काळात उच्च शिक्षण घेतल्यावर लग्नाबाबत निर्णय घेताना अनेक मुलींच्या मनात शंका असतात. विशेषतः तांत्रिक शिक्षण पूर्ण केल्यावर व्यावसायिक कुटुंबात संसार करणे हे एक आव्हान मानले जाते. मात्र हे आव्हान पेलत आदर्श निर्माण करण्याचा कोल्हापूर येथील उच्च शिक्षित इंजिनियर सौं. कौशिकी कारीकर यांचे विशेष मार्गदर्शन सोलापूरच्या सोनार समाज गौरव सोहळ्यात मिळणार आहे.



येत्या रविवारी दि. २८ डिसेंबर रोजी विजयपूर रोड वरील निर्मिती लॉन्स येथे सकाळी १० वाजता होणाऱ्या यां सोहळ्यात त्या समाजातील उपवर मुली आणि पालकांशी संवाद साधतील. धैर्याचा सन्मान – हिरकणी पुरस्काराचा इतिहास -- सौं. कौशिकी कारीकर या उच्च शिक्षित इंजिनियर असूनही त्यांनी मोठ्यां धैर्याने ते एका व्यावसायिक कुटुंबातील जीवन साथीची निवड केली.त्यांच्या या धाडसी निर्णयाची आणि कौटुंबिक समन्वयाची दखल घेऊन सोनार समाज संस्थेने तीन वर्षांपूर्वीच त्यांना हिरकणी पुरस्कार जाहीर केला होता. त्यावेळी कांही अपरिहार्य कारणास्तव त्या उपस्थित राहू शकल्या नव्हत्या. दि. २८ डिसेंबर रोजी त्या उपस्थित राहणार आहेत. मुलींना मिळणार प्रेरणा --- लग्नानंतर स्वतःचे करिअर आणि व्यावसायिक घरातील संसार यांचा समतोल कला साधत शौर्य आणि धैर्याने निर्णय कसे घ्यावेत यावर त्या उपवर मुलींना मार्गदर्शन करतील.उच्च शिक्षित मुलींनी व्यावसायिक जीवन साथी निवडणे ही भीती नसून एक संधी आहे . हा संदेश त्या आपल्या अनुभवातून देणार आहेत. याचा लाभ घेण्यासाठी समाजातील महिला, युवती आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सोनार समाज संस्थेने केले आहे.

## अंधश्रद्धांच्या अंधारावर विज्ञानाचा घणाघात !

**निलंगा/प्रतिनिधी :** समाजाला मागासलेपणाकडे ढकलणाऱ्या अंधश्रद्धा, अंधविश्वास आणि भीतीच्या साखळदंडातून भावी पिढीची मुक्तता करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशाला, अंबुलगा बु. येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने धगधगता व प्रबोधनात्मक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठ, तर्कशुद्ध आणि निर्भय विचारांची ठिणगी पेटली.

या कार्यक्रमासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या मा. भोसले सर यांनी प्रत्यक्ष वैज्ञानिक प्रयोगांच्या साहाय्याने भूत–प्रेत, करणी, जादूटोणा, ग्रहदोष, अपशकुन यांसारख्या अंधश्रद्धांची निर्भीडपणे पोलखोल केली. भीती निर्माण करून समाजाची फसवणूक करणाऱ्या खोट्या समजुती कशा पद्धतीने पसरवल्या जातात, हे त्यांनी शास्त्रीय पुराव्यांसह स्पष्ट केले. ‘‘तर्क नसेल, तर विश्वास नको!’’ असा ठाम संदेश देत भोसले सरांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक दाव्यामागे प्रश्न विचारण्याची सवय लावण्याचे आवाहन केले. प्रयोगांचे थेट सादरीकरण पाहताना विद्यार्थी अचंबित झाले होते. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील भीती, शंका आणि गैरसमज मोकळेपणाने मांडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय संविधानाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. संविधानात नमूद केलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि प्रगतीशील मूल्यांचा अंगीकार करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक मा. शिवशंकर मिरगाळे, उपसरपंच मा. जगदीश सगर, इंदिरा कन्या शाळेचे मुख्याध्यापक मा. सूर्यवंशी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, कुलकर्णी सर, गिरी सर, पाटील सर, मुळजे सर, मिरगाळे मॅडम, बिराजदार मॅडम, शानिमे मॅडम तसेच इंदिरा कन्या शाळेचे पाटील सर, सुडे सर, गिरी सर, नागमोडे मॅडम आदी मान्यवर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उपक्रम अंधश्रद्धा, भीती आणि अज्ञानाविरोधातील लढ्याला बळ देणारा ठरला असून, समाजप्रबोधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## ऊर्जा कंपन्यांच्या वाहनचालकांसाठी महापारेषणतर्फे लोणावळ्यात कार्यशाळा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वतीने वाहनचालकांसाठी दोन दिवसीय कार्यशाळा लोणावळा येथील हॉटेल रिदममध्ये घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उदघाटन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक यांच्या हस्ते झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, महावितरणचे माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. अमोल मालठाणे, श्री. प्रदीप शिनगारे, वाहतूक पोलिस निरीक्षक श्री. संतोष जाधव उपस्थित होते.





**लोणावळा : येथील हॉटेल रिदममध्ये महापारेषण कंपनीच्या वतीने वाहनचालकांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक. शेजारी अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, महावितरणचे माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे.**

यावेळी बोलताना श्री. पाठक म्हणाले, कंपनीच्या प्रगतीमध्ये वाहनचालकांची महत्त्वाची भूमिका आहे. वाहनचालकांनी अधिकाऱ्यांची मानसिकता ओळखून त्यानुसार काम केल्यास ते अधिक प्रभावीपणे होऊ शकते. वाहनचालकांच्या समस्येचे दैनंदिन कामकाज करताना निराकरण तत्काळ करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

श्रीमती सुचिता भिकाने म्हणाल्या, कार्यशाळा हा एक प्रकारचा स्नेहमेळावाच आहे. दैनंदिन कामकाज करताना वाहनचालकांनी शारीरिक व मानसिक आरोग्य सांभाळायला हवे. वाहनचालकांच्या काही समस्या असतील तर थेटपणे बोला. त्याचे निराकरण करण्याबाबतची कार्यवाही प्रशासनस्तरावर करण्यात येईल.

सुरूवातीला श्री. राजू गायकवाड यांनी प्रास्ताविकात वाहनचालकांसाठी हे प्रशिक्षण म्हणजे कौटुंबिक स्नेहमेळावाच आहे. सर्व वाहनचालकांची या कार्यशाळेच्या निमित्ताने एकमेकांमध्ये विचारांची देवाण–घेवाण व्हावी, परस्पर सहकार्य रहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बद्देला, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, उपव्यवस्थापक (मानव संसाधन शिष्टाचार) श्री. जितेंद्र ढोबळे, उपकार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) श्री. अमित सरोदे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांनी केले.

## जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार

**प्रा डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांचे प्रतिपादन**




**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि श्री यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे व प्रा. नागेश सुगरे हे होते.यावेळी प्रा. वैशाली जयशेट्टे प्रा. शैलेश कानडे प्रा दीपक बजाज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रा.डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना ग्राहक हक्क व ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार असतो.तसेच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक हक्कांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेतले जाण्याचा हक्क तसेच भरपाईचा हक्क याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. नागेश सुगरे यांनी विद्यार्थ्यांना वस्तू खरेदी करताना घ्यावयाची काळजी, तसेच ग्राहकांची फसवणूक झाल्यास न्याय कुठे व कसा मिळवता येतो, याबाबतची प्रक्रिया स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक बजाज यांनी केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. वैशाली जयशेट्टे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक बजाज यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शैलेश कानडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते.

## फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे चाकूरकरांना भावपूर्ण श्रध्दांजली

**लातूर/प्रतिनिधी :** : महाराष्ट्र फ ेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.





लातूर जिल्हा न्यायालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील ह्या होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व उपस्थित महिला विधिज्ञांनी स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र आदरांजली वाहिली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ॲड. जयश्रीताई पाटील यांनी स्व. चाकूरकरांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. राजकारणातील एक ऋषीतुल्य व्यक्तीमत्व असणारे शिवराज पाटील चाकूरकर एक निष्कलंक चारित्र्याचे महान नेते होते. त्यांचे कार्य कायम आपणा सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

२०१४ मध्ये ते महाराष्ट्र फ ेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या कार्यक्रमासाठी दयानंद सभागृहात आले होते. त्यावेळी त्यांनी महिला विधिज्ञ संघटनेच्या कार्याचे कौतुकही केले होते. त्यांच्याकडून मिळालेली कौतुक व अभिनंदनाची पाठिवरील थाप महिला विधिज्ञांना कायम प्रेरणा देणारी असल्याची भावना जयश्रीताईंनी व्यक्त केली.

या प्रसंगी महिला वकील ॲड.पल्लवी कुलकर्णी, ॲड. प्रतिभा कुलकर्णी, ॲड. अरुणा वाघमारे, ॲड. वसुधा नाळापुरे, ॲड.बिडवे, ॲड.बोरा, ॲड. गायत्री, ॲड. प्राजक्ता, ॲड. रेश्मा, ॲड. कविता, ॲड. कोमल आदींची उपस्थिती होती. या सर्व सदस्यांनी विनम्र अभिवादन करून चाकूरकरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पंतप्रधानांच्या पत्नी जशोदाबेन यांनी तुळजापुरात घेतले दर्शन

## देशाच्या सुख-समृद्धी आणि कल्याणासाठी केली प्रार्थना



तुळजापूर (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन व त्यांचे चुलत बंधू अशोक मोदी यांनी मंगळवारी (दि. २३) सकाळी कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन यथासांग पूजा, आरती केली.

जशोदाबेन मोदी व बंधू अशोक मोदी यांनी ओळख न सांगता साधेपणाने तुळजापुरात येऊन श्रद्धेने श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. पुजारी सचिन वसंतराव अमृतराव यांनी जशोदाबेन यांच्या पूजेचे पौरोहित्य केले.

यावेळी जशोदा बेन मोदी यांनी मातेचरणी फूल अर्पण करून देशाच्या सुख-समृद्धी आणि कल्याणासाठी प्रार्थना केली. यावेळी पुजारी अमृतराव यांनी मातेची प्रतिमा भेट देऊन मोदी परिवाराचा आदर सत्कार केला.

# शिवा वेलनेस अँड फिटनेस सेंटरचे शरणभैया पाटील यांच्या हस्ते उदघाटन



मुरूम (सुधीर पंचगल्ले) शिवा वेलनेस अँड फिटनेस सेंटरचे शरणभैया पाटील यांच्या हस्ते उदघाटन केले यावेळी ते म्हणाले,आपल्या बदलत्या जीवनशैलीमध्ये मला वाटतं आज पूर्वी पन्नाशीच्या नंतरचे आजार व्हायचे आज आमच्या ३० वयातल्या मुलांना आजार होत आहेत शुगर ब्लडप्रेशर डिप्रेशन अनेक आजार आपल्याला होत आहेत पूर्वीच्या काळामध्ये तिथे आमचे ज्येष्ठ लोक आहेत ते शेतामध्ये काम करायचं आपल्याशी साधं जेवण आहे ते जेवायचे आणि तंदुरुस्त राहायचे. आज मला अशी परिस्थिती झालेली आहे की आम्हाला तरुणांमध्ये दिसण्याचे फार मोठे प्रमाण वाढणे आणि त्याच्या वरती सगळ्यात मोठे म्हणजे स्ट्रेस आपण टेन्शन फार घेतो तर हरिश्चंद्र मामा सोनवणे जागतिक आरोग्य सल्लागार यांनी बोलून सुद्धा दाखवले एक विषय त्यांनी सांगितले आपल्याला की आरोग्याच्या बाबतीमध्ये ही त्यांच्याशी हरबल लाईफ चे प्रोडक्ट्स आहेत स्वतः मामांचे फोटो मी बघितल आज मामा एकदम तरुण दिसतात तुम्ही मामाच १०० वजन होते ते आता वजन कमी करून दिल्ली वर्कआउट व सकस संतुलित आहार येऊन ७० किलो वरती आलेत आता मी स्वतः मला अनुभवलेली मी आज त्यांचे व्हिडिओ बघतो मी कधीकधी करतात तर आपल्या सगळ्यांना आपण सगळे काम करतो आपल्या घरामध्ये आता आमच्या माता भगिनी काम करता आपण बाहेर काम करतो शेतामध्ये काम करतो आपण नोकरीला जातो किंवा आपले जे काही काम असेल पण सकाळी माझ्या सर्वांना विनंती आपण सगळ्यांनी एक तास तरी आपल्या शरीराला वेळ दिला पाहिजे लग्न झाल्यानंतर जर मुलगा झाला रात्री वेळ होतो दररोज ५ किलोमीटर रनिंग करतोय त्यामुळे लोकांनी राजकीय असं मॅडम आहेत कारण ज्यावेळेस आपला अधिक पोट वाढतं कारण म्हणून आजार आपल्या पोटातून निर्माण होतात हे मामांची चर्चा करत होतो की आजार हे शक्यतो आपल्या पोटापासून सुरू होतात अपचन ॲसिडिटी अनेक आजार आहेत यापुढे आपलं तसा आजार सुरुवात झाला आणि आपल्याला मग हॉस्पिटलला जायचं डॉक्टर दाखवा अनेक प्रॉब्लेम करा पण आपल्या हरबल लाईफच्या माध्यमातून, मला फार आनंद झाला. आज लोकांना काळाची गरज आहे आपले देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी म्हणल्याप्रमाणे मला मुरूमच्या आमच्या परिसरामध्ये आपल्या या स्वावलनेस अँड फिटनेस सेंटर मुरूम परिवारामध्ये मी पण आपल्या सोबत राहणार आहे जरी व्यासपीठाचे जरी मी आपल्या सोबत राहतो कारण शेवटी आपल्याला या माध्यमातून जायचं आहे आणि मला आपल्याला एक उदाहरण देतो मी आपण सगळ्यांना आता धीरूभाई अंबानी माहिती सगळ्यांना माहित आहेत त्यांचा एक मुलगा बघितला आपण त्यांच्याकडे अफाट संपत्ती त्याच्याकडे तुम्ही एक मोठी गाडी म्हणलं त्याच्याकडे १५ १५ कोटी वाहन आहेत त्यांच्या लग्ना मध्ये त्यांनी सांगितलं की सगळं आहे पण शरीर नाही तर भावांनो संपत्ती पद प्रतिष्ठा पेक्षा सगळ्याच चुकीचं असेल तर तो सगळ्यात चांगलं सुखी माणूस असेल त्याचं वजन होते तो आजारापासून मुक्त आहे तोच खरे मानवी सुखी जीवनात आपल्या याच्यात जगता पैसा आहे आपण ठीक आहे मला पाहिजे म्हणून आमच्या शिवा वेलनेस सेंटरला मी स्वप्नील शिवा यांना आश्वासित करतो मी तुमच्या परिवारात मला तुम्हीच घ्या आणि सुरुवात या निमित्ताने आमचे सर्व माता-भगिनी उपस्थित आहेत...... शेवटी त्यांनी शिवावेलनेस वचिटणीस सेंटरला शुभेच्छा दिल्या....

# ग्रामस्थांकडून एकाच दिवसांत ३ लाख २० हजारांचा कर भरणा; जकेकूर वाडी ग्रामपंचायत ठरली धाराशिव जिल्ह्यात भारी




उमरगा (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जकेकूरवाडी (ता उमरगा) येथील ग्रामस्थांनी सोमवारी (दि २२) एकाच दिवसांत ३ लाख २० हजार पाचशे रुपयांच्या रकमेसह ग्रामपंचायतीचा कर भरणा केला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे धाराशिव जिल्ह्यात एका दिवसात संपूर्ण कर भरणा करणारी एकमेव ग्रामपंचायत ठरली आहे.


तालुक्यातील २८० कुटुंब तर १ हजार ६६६ लोकसंख्या असलेल्या जकेकूर वाडीची आदर्श गाव म्हणून ओळख आहे. गावात सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. याच परंपरेला पुढे नेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला. या अभियानाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या वतीने ग्राम स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड, आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती कार्यक्रम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांना ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे या अभियानाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून ग्रामस्थांनी एका दिवसात १०० टक्के ग्रामपंचायत कर भरण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

त्यानुसार गावातील प्रत्येक नागरिकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून स्थावर मालमत्ता व पाणीपट्टी ग्रामपंचायत कराचा भरणा एकाच दिवशी पूर्ण केला. परिणामी ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय बळकटी आली असून आगामी विकासकामांना गती मिळणार आहे. तर जिल्ह्यात एकाच दिवशी सर्व कर भरणारी पहिली ग्रामपंचायत ठरली आहे. जकेकूरवाडी ग्रामस्थांनी दाखवून दिलेला हा आदर्श जिल्ह्यातील इतर गावांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

**गावाला विभागस्तरापर्यंतचे विविध पुरस्कार!**

तालुक्यातील जकेकुरवाडी ग्रामपंचायतीला आतापर्यंत विभागीय स्तरापर्यत विविध ६ पुरस्कार मिळाले आहेत. यात अनुक्रमे सर्व प्रथम क्रमांक तालुका व जिल्हा स्तरीय आर आर आबा स्मार्ट व्हिलेज. तालुका, जिल्हा व विभाग स्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम स्वच्छता प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच रोटरी क्लब आदर्श ग्राम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# शिवारात जाऊन कोळपणीत मग्न जगाच्या पोशिंद्याचा सन्मान



कळंब (प्रतिनिधी)- शेती कामात जुंपलेल्या बैलांना हाकारत कोळपणी करणाऱ्या व्यग्र असलेल्या बळीराजाचा शेतात जाऊन सन्मान करण्यात आला. पिंपळगाव डोळा येथील शिवारात शेतकरी पांडुरंग आंबीरकर यांचा राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त सत्कार करण्यात आला.

या निमित्ताने कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिकांनी पिंपळगाव (डोळा) शिवारातील शेतामध्ये प्रत्यक्ष शेती कामात व्यग्र असलेले शेतकरी पांडुरंग आंबीरकर यांचा शेतात जाऊन सत्कार केला. ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, ज्येष्ठ नागरिक माधवसिंग राजपूत, अच्युत उर्फ बाबूराव पौळ, सुनील लाटे, शेतकरी श्रीकांत आंबीरकर, गणेश हाजगुडे, भाग्यश्री हाजगुडे, कविता पाटील, गोपाळ हाजगुडे आदी उपस्थित होते. उन्हा, पावसात आणि थंडीत अथक कष्ट करून घाम गाळत काळ्या आईची सेवा करणारा आणि धान्य पिकवून जगाचा पोशिंदा ठरणारा शेतकरी यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी दरवर्षी २३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा केला जातो. हा दिवस शेतकरी नेते व देशाचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येतो.

जगाच्या पोशिंद्याप्रती आदरभाव जपला... हा सन्मान शेतकरी दिनानिमित्त जगाच्या पोशिंद्याचा आहे. वर्षभर काबाडकष्ट करून जगाचे उदरभरण करणारा शेतकरी कधीही समोर दिसत नाही. त्याचा सन्मान करणं हाच यामागाचा उद्देश असल्याच्या भावना ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **HAQ SULTANA BEGUM MOHAMMAD HIMAYATUL** TO **HAQ SULTANA BEGUM MOHD HIMAYATUL**

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **HAQ SULTANA BEGUM MOHD HIMAYATUL** will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- **HAQ SULTANA BEGUM MOHAMMAD HIMAYATUL.**

NEW NAME:- **HAQ SULTANA BEGUM MOHD HIMAYATUL.**

Address :- 2/4,SAWARKAR CHOUK,MARWAD GALLI, MAIN ROAD, OSNANABAD. DIST. OSMANABAD -413501

AADHAR NO.- 728017347718

Mob. No.-8928114343

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# अटीतटीच्या लढतीत गंगणे यांनी भेदले चक्रव्यूह



तुळजापूर(प्रतिनिधी)-अतिशय अटीतटीच्या लढतीत भापजच्या विनोद गंगणे यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अमर मगर यांचा पराभव करीत पालिकेवर स्पष्ट बहुमत मिळविले. भाजपाचे १८ उमेदवार व काँग्रेसचे ५ जण विजयी ठरले.

निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मध्ये पंडित जगदाळे विजयी ( १४३२), पराभूत अर्जुन भोजने ( ३६८) सौ मंजुषा देशमाने विजयी ( १३४१), सौ जयश्री साबळे ( ४२५), भाग २ मधील विजय कदम औदुंबर पंडितराव (१११८), पराभूत जीवन उपेंद्र कदम (६१७), नीता दिनेश क्षीरसागर विजयी (१११२), पराभूत कोमल आनंद रोचकरी (६२७), प्रभाग क्रमांक ३ मधील पेंदे लखन भालचंद्र विजयी (१३२५) तट बालाजी रावसाहेब (८३६), १८८६ मताने विजयी, प्रभाग ४ विजयी रोचकरी सुनील संभाजी (१६०६), कदम सोनजी विनोद (५७९), श्वेता वैभव साळुंखे विजयी (१२८२) अमृता सुदर्शन वाघमारे (७६४), प्रभाग पाच मधून विजयी महानंताबाई किशोर साठे (११८३), चव्हाण भाग्यश्री प्रमोद (११५२)

भोसले चंद्रशेखर बाळासाहेब विजयी ( १७४८) चोपदार राकेश राजेंद्र (९२२), प्रभाग ६ मधून विजयी सागर विलास कदम (१२२१) कदम सुभाष मारुती (५६२), सरोजा नरेश अमृतराव विजयी (११७९) अरुणा गोरक्षनाथ पवार (५६४), प्रभाग ७ मधून विजयी प्रगती गोपाळ लोंढे (११२९), अमृता दादासाहेब खपले (१०४२), जाधव अमरीश अशोकराव (९३७) रणजीत चंद्रकांत इंगळे विजयी (१२४५), प्रभाग क्रमांक ८ मध्ये विजयी सावंत ज्योती आनंद (११२६) विजयी, पांडागळे रेखा श्रीकांत (१०७४), अक्षय धनंजय कदम विजयी (१३२९), संतोष देविदास कदम (१०३९), प्रभाग क्रमांक ९ विजयी अमोल माधवराव कुतवळ (१३३०), अण्णाप्पा नामदेव पवार (६७४), जयश्री विजयकुमार कंदले विजयी (१३३०)

धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र भाजप, शिवसेनेची घोडदौड

मोनिका श्रीकांत रसाळ (९०९), प्रभाग क्रमांक १० मध्ये विजयी आनंद नानासाहेब जगताप विजयी (९५६), रोचकरी सचिन ज्ञानोबा (५७८) प्रियंका विजय गंगणे विजयी (७७९), धरती चिन्मय मगर (७४१), प्रभाग ११ अश्विनी विशाल रोचकरी विजयी (२००७), बडोदकर संगीता शहाजी (६३९), प्रिया मनोज मलकुनाईक विजयी (१८५७) प्रमोदिनी प्रशांत अपराधी (६९०), रामचंद्र सुखदेव रोचकरी (२१२४), विजय राहुल विनोद खपले (५०२) हे विजयी झाले. नगराध्यक्ष पदाच्या चुरशीच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराने बाजी मारली. ड्रग्ज प्रकरण या निवडणुकीत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी गाजविले होते मात्र मतदारांनी या निवडणुकीत आपला भारतीय जनता पार्टीच्या बाजूने दिल्यामुळे विनोद गंगणे यांचे शहरातील स्थान अधोरेखित झाले आहे.

जगानाळे पाचव्यांदा विजयी

तुळजापूर खुर्द या प्रभागाचे विद्यमान नगरसेवक पंडित जगदाळे यांचा पाचव्यांदा विजय झाला. माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी आणि संतोष परमेश्वर कदम यांचा दारुण पराभव या निवडणुकीत झाला. काँग्रेसचे रणजीत इंगळे व आनंद जगताप हे सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे चांगल्या मतांनी निवडून आले. यापूर्वी अजित परमेश्वर यांच्या मुलगी डॉ. कदम हिचा बिनविरोध विजय झालेला आहे. विनोद गंगणे यांना या निवडणुकीत सर्व बाजूंनी घेतले गेले होते खासदार आणि स्थानिक सर्व विरोधकांनी हल्ला करूनही त्यांनी आपला विजय संपादित केला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649